पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ७९ ● गुरूवार, दि. २४सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

सिटी न्यूज सुपरफास्ट

**सुट्टीची सुचना**

सर्व एजंट, प्रतिनिधी, वाचक, यांना कळविण्यात येते की, दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्दशीनिमित्त कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. त्यामुळे २५ सप्टेंबर रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

- वितरण व्यवस्थापक

## »थोडक्यात

### ज्यांच्यावर आक्षेप घेतला त्यांचीच युसीसीवर थेट नियुक्ती!

**मुंबई :** महाराष्ट्र समान नागरी संहिता समितीवर (यूसीसी) सेवानिवृत्त आयएएस अधिकारी शत्रुघ्न सिंग यांची २१ सप्टेंबर रोजी सदस्य-सह-वरिष्ठ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण यांनी राजीनामा दिल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत ही नियुक्ती करण्यात आली आहे.

### झारखंडच्या कॅबिनेट मंत्र्यांच्या मुलीसह ४ जणांचा अपघातात मृत्यू

**झारखंड :** एक कार आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात झारखंडच्या ग्रामीण विकास मंत्री दीपिका पांडे सिंह यांच्या मुलीचा मृत्यू झाला आहे. कारमधील इतर ३ जणांनाही या अपघातात आपले प्राण गमवावे लागले आहेत. हा अपघात बुधवारी उशिरा रात्री घडला असून, धडक इतकी जोरदार होती की कारचा पूर्णपणे चक्काचूर झाला.

# कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांनाही कर्जमाफी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची वाशिममध्ये घोषणा

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**वाशिम :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाशिममध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. २०१६-१७ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीची सर्वात मोठी घोषणा केली. तसेच, कोरड्या दुष्काळाचा जीआर आणि विमा प्रश्नांवरही मार्ग काढणार असून, दुष्काळात कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेल्या दोन दिवसांपासून दुष्काळी भागाची पाहणी करत आहेत. गुरूवार, २४ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांनी वाशिममध्ये शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले, त्यांची निवेदने स्वीकारली. तुम्ही काळजी करू नका. सरकार तुमच्या पाठीशी आहे. कोरड्या दुष्काळाचा जीआर आम्ही काढणार आहोत, असं सांगतानाच जे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत, त्यांनाही कर्जमाफी केली जाणार आहे, अशी घोषणाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी



केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री वाशिम जिल्ह्यातील मसाल गावात आले होते. यावेळी त्यांना भेटण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. एका शेतकऱ्याने तर मुख्यमंत्र्यांचे दर्शन घेतलं. अनेक शेतकरी पिकांपासून ते पाण्यापर्यंतच्या व्यथा मांडत होते. मुख्यमंत्र्यांनी या सर्व शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले, त्यांना धीर दिला.

### देवेंद्र फडणवीस आगे बढो!

२०१६-१७ मध्ये कर्जमाफीत जे वंचित राहिले होते. त्या सर्वांना आम्ही कर्जमाफी देणार आहोत. वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही मदत करणार आहोत. तुम्ही काळजी करू नका. सरकार तुमच्या पाठिशी आहे, असं फडणवीस यांनी जाहीर केलं. फडणवीस यांनी ही घोषणा करताच शेतकऱ्यांनी देवेंद्र फडणवीस आगे बढोच्या घोषणा दिल्या. जे शेतकरी तक्रारी करण्यासाठी आले होते, ते घोषणा देत होते.

### मी तुम्हा सर्वांना मदत करणार!

फडणवीस यांचा ताफा जात असताना शेतकऱ्यांनी हात उंचावले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ताफा थांबवून शेतकऱ्यांशी संवाद साधला. मी तुम्हा सर्वांना मदत करणार आहे. तुमचे प्रश्न सोडवणार आहे. तुम्ही काळजी करू नका. आम्ही कोरड्या दुष्काळाचा जीआर काढणार आहोत. विम्याचे प्रश्नही मार्गी लावणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# आरोग्य सेवक भरतीच्या नावाखाली 14 लाखांची मागणी

## जिल्हा परिषद (भाग एक ) ७ लाखांचा व्यवहार अन् ३ लाखांचा चेक बाऊन्स !

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

अकोला: जिल्हा परिषद आरोग्य विभागात आरोग्य सेवक पदाची कोणतीही अधिकृत भरती प्रक्रिया किंवा जाहिरात निघाली नसतानाही, बेरोजगार तरुणांना नोकरीचे खोटे आमिष दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपयांची लाट मारल्याचा अत्यंत संतापजनक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण गैरव्यवहारात जिल्हा परिषदेतील एका कर्मचाऱ्याचा थेट सहभाग असल्याचा गंभीर आरोप होत असून, या हायप्रोफाइल फसवणुकीने अकोला जिल्हा वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार,




या संपूर्ण प्रकरणाच्या केंद्रस्थानी जिल्हा परिषदेतील 'इलियाज' नावाचा कर्मचारी असल्याचे समोर आले आहे. आरोग्य सेवक पदावर हक्काची नोकरी लावून देण्याचे आश्वसन देत या कर्मचाऱ्याने संबंधित उमेदवाराकडून तब्बल चौदा लाख रुपयांची अवाच्या सव्वा मागणी केली होती. यातील तब्बल सात लाख रुपये ॲडव्हान्स म्हणून उकळण्यात आल्याचा दावा केला जात आहे.

विशेष म्हणजे, हा काळाबाजार उघडकीस येण्यापूर्वी हाच इलियाज कर्मचारी जिल्हा परिषदेच्या 'आवक-जावक' विभागात कार्यरत होता. मात्र, या आर्थिक व्यवहाराची कुजबूज वाढताच त्याची आता जिल्हा परिषदेच्या दूसऱ्या विभागात तडकाफडकी बदली करण्यात आल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. खात्यांतर्गत बदल्या करून या गंभीर प्रकरणावर पडदा पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे का, असा संतापजनक सवाल आता उपस्थित होत आहे. बेरोजगार तरुणांना अशा प्रकारे लाखो रुपयांचा चुना लावणारे हे रॅकेट नेमके कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे ? इलियाज याने हे पैसे स्वतःच्या खिशात घातले की यामागे आणखी कुणी मोठे अधिकारी किंवा राजकीय वरदहस्त असलेले पांढरपेशा लोक आहेत, याचा पर्दाफाश होणे अत्यंत गरजेचे आहे.

## प्राथमिक शिक्षण विभागात पदोन्नती आणि वरिष्ठ श्रेणीच्या फाईल्स क्लिअरसाठी '२५ हजारांचा रेट'!

अकोला: अकोला जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात खाजगी तसेच जिल्हा परिषद शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, निवड श्रेणी आणि वरिष्ठ श्रेणीनुसार सुधारित पगाराच्या फाईल्स क्लिअर करण्यासाठी थेट २५ हजार रुपयांची वसुली केली जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या मनमानी कारभारामुळे शिक्षक वर्ग चांगलेच वैतागला असून, पैशांची मागणी करणारा नेमका वसुलीबहाद्दूर कोण ? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. अशी माहिती नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर सूत्रांनी दिली आहे. नियमानुसार सर्व प्रशिक्षण पूर्ण झाले असताना आणि सर्व पात्रता पूर्तता असतानाही, वरिष्ठ व निवड श्रेणी लागू असलेल्या शिक्षकांना केवळ शिक्षण विभागाच्या चकरा माराव्या लागत आहेत. फाईल तपासण्याच्या आणि ती पुढे सरकवण्याच्या नावाखाली सर्रास २५ हजार रुपयांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. जोपर्यंत हा 'रेट कार्ड' वरील पैसे दिले जात नाही, तोपर्यंत पदोन्नतीची फाईल क्लिअर केली जात नसल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात जोरदार रंगली आहे. सध्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात नेमक्या किती शिक्षकांच्या पदोन्नती आणि वरिष्ठ श्रेणीच्या फाईल्स विनाकारण प्रलंबित ठेवण्यात आल्या आहेत, याची सखोल खातरजमा करण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह अमरावती येथील शिक्षण उपसंचालकांनी या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# खाजगी बस,गोदामातील बनावट खवा जप्त अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई!

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला :** गुजरातहून अकोल्यात विक्रीसाठी आणला जात असलेला सुमारे एक हजार ते बाराशे किलो वजनाचा संशयित खव्याचा मोठा साठा अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने लक्झरी बसस्थानक परिसरात यशस्वीरीत्या पकडला आहे. सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या धडाकेबाज कारवाईत सुमारे ३ ते ४ लाख रुपये किमतीचा खवा जप्त करण्यात आल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तर दूपारी पक्की खोली येथे टाकलेल्या छाप्यात एफ डी ए ने १०० ते २०० किलो क्विंटल खवा जप्त केल्याची माहिती समोर आली आहे.

खाजगी बस मधून आलेल्या व गोदामातील हा खवा कोण्या व्यापाऱ्याला दिला जाणार होता याची चर्चा आज खाद्य उद्योगात आहे. या दोन्ही प्रकरणात अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या माहिती नुसार



कमल शर्मा,संदीप निरंकारी,शुभम पाटील,वैभव आणि पीयूष नागवाणी यांच्यावर संशय व्यक्त केला गेला आहे.

सदर कारवाई एस.डी. केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक आयुक्त डी.जी.वीर, अन्न सुरक्षा अधिकारी आर.डी.सोळंके, कि.ह.बोरचाटे यांनी केली. गुजरातहून एका लक्झरी बसमधून हा खवा अकोल्यात आणण्यात येत असल्याची गुप्त माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने लक्झरी बसस्थानक परिसर गाठून कारवाई केली. संशयित खवा ताब्यात घेण्यात आला असून, त्याचे नमुने तातडीने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. आणलेला खवा मानवी सेवनासाठी योग्य आहे की नाही, तसेच त्यामध्ये काही भेसळ किंवा आरोग्यास घातक घटक आहेत का, याबाबतची सविस्तर माहिती प्रयोगशाळेच्या अहवालानंतरच स्पष्ट होईल. अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार कडक कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. सणासुदीच्या काळात मिठाईला मोठी मागणी असते. अशा काळात गुजरातमधून मोठ्या प्रमाणावर खवा अकोल्यात आणला जात असल्यामुळे त्याच्या दर्जाबाबत व सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# चार महिने बंदोबस्त, मानधन मात्र थकीत!

## होमगार्ड जवान आर्थिक अडचणीत

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला :** पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या अकोला जिल्ह्यातील होमगार्ड जवानांचे मागील चार महिन्यांपासून मानधन थकीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. उन्हापावसात बंदोबस्तावर तैनात राहणाऱ्या जवानांनाच त्यांच्या मेहनतीचे मानधन वेळेवर मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

गणेशोत्सव, विविध धार्मिक कार्यक्रम, वाहतूक व्यवस्था, निवडणुका तसेच कायदा-सुव्यवस्थेच्या कठीण प्रसंगी होमगार्ड जवानांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पोलिस विभागावरील मनुष्यबळाचा ताण कमी करण्यासाठी हे जवान सातत्याने सेवा देतात. मात्र, चार महिन्यांचे मानधन रखडल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते आणि दैनंदिन गरजा भागविताना जवानांना प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. काम नियमित असतानाही मानधन का रखडले? असा संतप्त सवाल आता होमगार्ड जवानांकडून विचारला जात आहे. यासंदर्भात वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासनेच मिळत असल्याने जवानांमध्ये नाराजीचा सूर तीव्र होत आहे. प्रशासकीय प्रक्रियेतील विलंबामुळे हा घोळ सुरू असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, थकीत मानधन नेमके कोणत्या कारणास्तव अडकले आहे, याबाबत जिल्हा होमगार्ड प्रशासनाने तातडीने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

# शिक्षक मतदार संघ निवडणुकीत त्या शिक्षकांना मिळणार 'आयफोन'

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला:** राज्यात आगामी शिक्षक मतदार संघ निवडणुकीचे मैदान चांगलेच तापले असून, या निवडणुकीतील प्रचाराच्या आणि हायटेक रणनीतीच्या चर्चांनी सर्वसामान्यांचे तसेच राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. पारदर्शक आणि वैचारिक मानल्या जाणाऱ्या शिक्षक मतदारसंघात आता पैशांची उधळण आणि महागड्या प्रलोभनांच्या चर्चांना उधाण आले आहे. एका प्रमुख उमेदवाराने निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी थेट वीस कोटी रुपयांच्या वाटपाचे टार्गेट ठेवल्याची कुजबूज सध्या जोरदार रंगली आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीची फिल्डिंग काही उमेदवारांनी लावली असून त्यासाठी साडी पैशांचे पाकिट आणि आता थेट आयफोन शिक्षकांना वाटप होण्याची चर्चा रंगली आहे.

## राजकीय वर्तुळात खळबळ आणि चर्चांना उधाण !

### महागड्या भेटवस्तूंचे वाटप आणि नाराजीचा सूर

मिळालेल्या माहितीनुसार, निवडणुकीत थेट प्रभाव पाडणाऱ्या निवडक आणि महत्त्वाच्या शिक्षकांना खूश करण्यासाठी चक्क 'आयफोन' देण्याची तयारी एका उमेदवाराने चालवली आहे. या हायटेक प्रलोभनासोबतच पारंपरिक पद्धतीचा अवलंब करत दोन ते पाच हजारांचे पाकिट आणि साड्यांचे वाटप केल्याची चर्चा आहे. मात्र, या निवडणुकीत सर्वांनाच समान न्याय मिळत नसल्याची दबकी चर्चा आहे. केवळ प्रभावी शिक्षकांनाच महागडे आयफोन दिले जात असून, इतर मतदारांसाठी साधे मोबाईल फोन बुक करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे इतर शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी वाढल्याचे बोलले जात आहे. ही केवळ चर्चा आहे की यात काही वास्तविकता आहे याची खातरजमा प्रशासनाने करण्याची गरज आहे.

### निवडणूक प्रशासनासमोर मोठे आव्हान

या सर्व प्रकारामुळे निवडणुकीची नैतिकता धोक्यात आली असून, मतदारांना अशा प्रकारे प्रभावित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या संपूर्ण हायटेक आणि आर्थिक गैरप्रकाराची गंभीर दखल घेत निवडणूक निरीक्षकांनी या हालचालींवर तातडीने लक्ष ठेवावे, अशी मागणी सुजाण मतदार व नागरिकांमधून केली जात आहे. निवडणुकीच्या तोंडावर रंगलेल्या या चर्चांमुळे संपूर्ण विभागात खळबळ उडाली आहे.

# आर आर सी समुहाचा 25 वा रौप्य महोत्सवी सोहळा दिमाखात संपन्न होणार

## 'द हेरिटेज' येथे मान्यवरांची असणार विशेष उपस्थिती!

अकोला: पश्चिम विदर्भातील पत्रकारिता क्षेत्रात आपल्या निष्पक्ष, निडर आणि वेगवान बातम्यांच्या माध्यमातून अल्पावधीतच कोट्यावधी दर्शक व वाचकांच्या मनात विश्वासाचे आणि आदराचे स्थान निर्माण करणाऱ्या 'आर आर सी समुह' व 'आर आर सी न्यूज' वृत्तसंस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा यंदा मोठ्या दिमाखात साजरा होत आहे. '२५ साल बेमिसाल' या ब्रीदवाक्याला साजेसे असे कर्तृत्व या वृत्तसंस्थेने गेल्या अडीच दशकांत गाजवले असून, टीव्ही, प्रिंट आणि डिजिटल या तिन्ही माध्यमांतून पत्रकारितेचे नवे आणि उच्च मापदंड प्रस्थापित केले आहेत. या गौरवशाली प्रवासाचा रौप्य महोत्सवी सोहळा आर आर सी चे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांच्या संकल्पनेतून आणि इव्हेंट आर्गनाइजर स्वप्निल रोम यांच्या कल्पकतेतून अत्यंत दिमाखदार समारंभात पार पडत आहे. या विशेष सोहळ्यानिमित्त राज्यातील राजकारणातील मान्यवर, प्रशासकीय शिल्पकार, उद्योगातील शिखर पुरुष आणि कला-सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज मानबिंदू एकाच मंचावर एकत्र येणार आहेत. आर आर सी समुह आणि न्यूजसोबत जोडलेल्या जुन्या व नव्या आठवणींना उजाळा देत नवीन इतिहासाची रचना करण्यासाठी हा सोहळा एक हक्काचे व्यासपीठ ठरणार आहे.




### शनिवारी २६ सप्टेंबर रोजी भव्य आयोजन

हा ऐतिहासिक सोहळा शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता, बाळापूर रोड, अकोला येथील 'द हेरिटेज' या हॉटेलमध्ये निमंत्रितांसोबत संपन्न होईल. यामध्ये स्नेहमिलनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आर आर सी न्यूजचे संस्थापक संचालक प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख आणि कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांच्यासह संपूर्ण आर आर सी समूहाचे सर्वच पातळीवर विशेष कौतुक होत आहे.

### मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटनाचा सोहळा

या भव्यदिव्य सोहळ्यास भारत सरकारचे केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री आणि बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार प्रतापरावजी जाधव हे या सोहळ्यास 'प्रमुख अतिथी' म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच,महाराष्ट्र शासनाचे कामगार मंत्री, अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा खामगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आकाश फुंडकर हे 'उद्घाटक' म्हणून्ो उपस्थित राहणार आहेत. याशिवाय, अकोल्याचे युवा खासदार अनुप धोत्रे, महाराष्ट्र प्रदेश भाजपचे विधिमंडळ प्रतोद व अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर, आमदार हरिश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार नितीन देशमुख, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार साजीद खान पठाण, महापौर शारदा खेडकर, आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांसह अनेक लोकप्रतिनिधी उपस्थित राहतील. प्रशासन व विविध क्षेत्रातील दिग्गज मंडळींमध्ये जिल्हाधिकारी वर्षा मिना, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, जिल्हा परिषद सीईओ अनय नावंदर, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्यासह राजकीय, सामाजिक, शिक्षण, उद्योग, वैद्यकीय आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांची या सोहळ्यास प्रमुख उपस्थिती राहील. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी अमरावती येथून खासदार बळवंत वानखडे, खासदार अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, जिजाऊ बँकेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अविनाश काठोळे, प्रा. अनिल बंड, आणि भाजपचे माजी प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख उपस्थित राहणार आहेत. तसेच वाशिम येथून खासदार संजय देशमुख व आमदार भावना गवळी यांची देखील या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभणार आहे. या सर्व दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमुळे या रौप्य महोत्सवी सोहळ्याची शान अधिकच वाढणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

२

गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# मनात आग असेल तर अडथळे कितीही मोठे असोत!



## गणपती Special... अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध मूलांक 9

जर तुमचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ९, १८ किंवा २७ तारखेला झाला असेल, तर तुमचा मूलांक ९. अंकशास्त्रीय दृष्टिकोनातून मूलांक ९ चा अधिपती मंगळ मानला जातो. मंगळ म्हणजे ऊर्जा, धाडस, संघर्ष, आत्मविश्वास, नेतृत्व आणि कृती. म्हणूनच मूलांक ९ ची व्यक्ती फक्त विचार करत बसणारी नसते्र तिला काहीतरी करून दाखवायचं असतं. पण या व्यक्तिमत्त्वाची एक सुंदर बाजू आहे. बाहेरून कणखर आतून अतिशय प्रेमळ. बोलण्यात स्पष्ट पण मनात भावना खोल. राग पटकन पण आपल्या माणसांसाठी प्रेमही तितकंच तीव्र.

'मला कुणी सांगू नयेष्ठ मी स्वतः ठरवतो!'

मूलांक ९ व्यक्तीला स्वतःच्या आयुष्याचा स्टेअरींग व्हील स्वतःच्या हातात ठेवायला आवडतो. सतत कुणाच्या आदेशाखाली काम करणं, प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप सहन करणं किंवा स्वतःच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित होणं त्याला आवडत नाही. त्याला जबाबदारी द्या, तो ती निभावण्याचा पूर्ण प्रयत्न करेल. म्हणून लिडरशीप, बिझनेस, स्पोर्टस, डीपेन्स,मॅनेजमेंट, ॲक्टींग, डान्सींग, फिटनेस यांसारख्या क्षेत्रांकडे त्याचा कल असू शकतो.

पण इथेच एक महत्त्वाचा धडा आहे— नेतृत्व आणि नियंत्रण यात फरक आहे. प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे झालीच पाहिजे, ही अपेक्षा वाढली की संघर्ष सुरू होतो. राग पटकन येतो, पण रागामागे काहीतरी असतं! त्याला अन्याय सहन होत नाही. आपला अपमान झाला, आपल्या माणसाला कोणी दुखावलं किंवा आपल्याला चुकीचं समजलं तर प्रतिक्रिया तीव्र असू शकते. कधी कधी समोरच्याला वाटतं, 'हा एवढा चिडला कशासाठी?' पण मूलांक ९ च्या मनात कदाचित आधीपासून अनेक गोष्टी जमा झालेल्या असतात. आणि मग एक छोटीशी गोष्टही ट्रीगर बनते. वय आणि अनुभव वाढत गेले की त्याला एक मोठा धडा शिकावा लागतो. राग येणं आपल्या हातात नसेल, पण रागानंतर काय करायचं, हे आपल्या हातात असतं.

नात्यांमध्ये — 'तू माझा आहेस, म्हणजे मी तुझ्यासाठी आहे.' प्रत्येकाला लगेच जवळ करत नाही. पण एकदा एखाद्या व्यक्तीने त्याचा विश्वास जिंकला की, तो मनापासून त्या नात्यात उतरतो. मित्र असो, कुटुंब असो किंवा जीवनसाथी. तो फक्त बोलत नाही, गरजेच्या वेळी उभा राहतो. कधी स्वतःची अडचण बाजूला ठेवूनही मदत करतो. याच प्रेमाची दुसरी बाजू अशी की, कधी कधी तो आपल्या जोडीदारासाठी किंवा जवळच्या व्यक्तीसाठी इतका समर्पित होतो की स्वतःच्या गरजा आणि स्वतःची ओळख मागे पडू शकते.

म्हणून, प्रेम करा पण स्वतःला हरवून नाही. तो क्षमा करू शकतो, पण विसरणं त्याच्यासाठी कठीण असू शकतं. तो मनात म्हणत राहतो. 'मी तुझ्यासाठी एवढं केलंष्ठ मग तू माझ्याशी असं का केलंस?' आणि याच विचारातून कधी राग, कटुता

### ॲनर्जीला योग्य दिशा द्या!

मूलांक ९ मध्ये ऊर्जा प्रचंड असू शकते. ही ऊर्जा योग्य दिशेने वापरली तर ती अचिव्हमेंट बनते. आणि योग्य आउटलेट न मिळाल्यास ती चिडचिडरेस्टलेटनेसे किंवा वादात बदलू शकते. म्हणून— जीम, योगा, चालणे, पोहणे, डान्स, स्पोर्ट, अशा शारीरिक हालचाली उपयोगी ठरू शकतात. ध्यानधारणा आणि श्वसनाचे व्यायाम मन शांत करण्यास मदत करू शकतात. एक वाक्य लक्षात ठेवा: ॲनर्जीला दिशा मिळाली तर ती ताकद बनते; दिशा मिळाली नाही तर ती संघर्ष बनू शकते.'

### करीअर आणि मनी

मूलांक ९ व्यक्तीला फक्त रूटीन डेस्क जॉबपेक्षा ॲक्शन, रिस्पॉन्सिबीलीटी, डीसकस मेकिंग असलेलं काम अधिक समाधान देऊ शकतं. त्याला स्वतःची मतं मांडता आली, निर्णय घेता आले आणि कामात काही ऑथरिटी मिळाली तर तो अधिक ऐंगेज राहू शकतो.




किंवा बदल्याची भावना वाढू शकते. म्हणून मूलांक ९ साठी सर्वात मोठा विजय कधी कधी समोरच्याला हरवण्यात नसतो. तर स्वतःच्या मनाला त्या व्यक्तीपासून मुक्त करण्यात असतो. सरळ बोलतो, म्हणून कधी गैरसमज होतात. मूलांक ९ ला गोष्टी फिरवून सांगणं फारसं जमत नाही. जे वाटतं ते स्पष्ट बोलतो. मुत्सद्देगिरीपेक्षा स्ट्रेट फारवर्डनेस त्याला नैसर्गिक वाटते. त्यामुळे काही लोकांना त्याचा स्पष्टपणा आवडतो, तर काहींना तो रागीट किंवा कठोर वाटू शकतो. सत्य काय आहे हे जितकं महत्त्वाचं, तितकंच ते कसं सांगितलं जातं हेही महत्त्वाचं. 'सगळं माझ्या म्दहूrदत् मध्ये आहे' मूलांक ९ अनेकदा आपल्या समस्या सहज कोणासमोर मांडत नाही. मनात कितीही वादळ असलं तरी चेहऱ्यावर. 'मी ठीक आहे.' कमजोर दिसणं त्याला आवडत नाही. कधी जवळच्या व्यक्तींनाही त्याच्या मनात खरं काय चाललंय हे समजत नाही. पण भावना सतत दाबून ठेवणं योग्य नाही. विश्वासू व्यक्तीसमोर मन मोकळं करणं ही कमजोरी नाही. ती स्वतःची काळजी घेण्याची ताकद आहे.

**मूलांक ९ ची काही प्रसिद्ध उदाहरणे :** अक्षय कुमार — ९ सप्टेंबर, ईशान किशन — १८ जुलै, सोनिया गांधी — ९ डिसेंबर, प्रियंका चोप्रा — १८ जुलै, नेल्सन मंडेला — १८ जुलै, ब्रूस ली — २७ नोव्हेंबर, सलमान खान — २७ डिसेंबर.

**मूलांक ९ ची खरी परीक्षा :** मूलांक ९ ला आयुष्यात अनेकदा संघर्ष भेटू शकतो. पण त्याचा खरा प्रश्न हा नसतो की— 'मी किती जोरात लढू शकतो?' खरा प्रश्न असतो— 'मला कुठे लढायचं आणि कुठे शांत राहायचं?' कारण प्रत्येक युद्ध जिंकण्याची गरज नसते. कधी माफ करून पुढे जाणं, कधी शांत राहणं, कधी 'मला फरक पडत नाही' असं खरंच मनापासून म्हणता येणं— हीसुद्धा ताकद आहे.

'जिस इंसान ने अपने गुस्से को ताकत बना लिया,
और अपने दर्द को हौसला, उसे रोकना आसान नहीं होता।
क्योंकि उसकी सबसे बड़ी लड़ाई, दुनिया से नहीं खुद से होती है।'

**मूलांक ९ — एका वाक्यात**

'बाहेरून आगष्ठ आतून प्रेम आणि आयुष्यभर स्वतःच्या ऊर्जेला योग्य दिशा देण्याचा प्रवास.' अंकशास्त्रात फक्त मूलांक पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरत नाही. जन्मतारखेतील इतर अंक, त्यांची पुनरावृत्ती आणि भाग्यांक यांचाही विचार केला जातो. तुमचा मूलांक ९ आहे का? तुमच्यातला सर्वात स्ट्रॉंग गुण कोणता — धाडस, राग की निष्ठा.



सीमा बक्षी
9834571153

# शासन शेतकऱ्यांसमोर दुष्काळाशी सामना करण्याचे आव्हान



राज्यावर दुष्काळाचे सावट असल्याने शेतकरी आणि प्रशासनासमोर आव्हाने उभे आहेत. पावसाची अनियमीतता, हवामान बदल आणि पाण्याचे घटते साठे यांमुळे यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळ हा केवळ शेतीचा प्रश्न न राहता सामाजिक आणि आर्थिक संकटाचे स्वरूप धारण करतो. या काळात शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडतो, तर शासनासमोर टंचाई व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे राहते. पावसाच्या अभावाने सुकलेली पिके. पाण्याच्या टंचाईमुळे जमिनीला पडलेल्या भेगा. दुष्काळाच्या छायेत बळीराजाची चिंता.

शेतकऱ्यांसमोरील प्रमुख आव्हाने

**पिकांचे नुकसान व उत्पन्नात घट:** वेळेवर पाऊस न पडल्यामुळे दुबार पेरणीचे संकट येते, किंवा उभी पिके वाळून जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही.

**चारा व पिण्याच्या पाण्याची टंचाई:** विहिरी आणि बोअरवेलची भूजल पातळी खालावल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते. तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध नसणे हे मोठे आव्हान ठरते.

कर्जबाजारीपणा आणि आर्थिक ताण: पेरणी, खते आणि बियाणांसाठी घेतलेले कर्ज भागवणे कठीण होते, ज्यामुळे शेतकरी सावकारी किंवा बँक कर्जाच्या गर्तेत अडकतात.

### प्रशासनासमोरील मुख्य आव्हाने

**टँकरद्वारे पाणीपुरवठा व चारा छावण्या:** टंचाईग्रस्त गावांमध्ये नियमित पिण्याचे पाणी टँकरने पोहोचवणे आणि पशुधनासाठी चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करणे हे मोठे आव्हान असते.

आर्थिक मदत व पीक विमा वितरण: नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पीक विम्याची भरपाई आणि शासकीय मदत पारदर्शकपणे व वेळेत पोहोचवणे आवश्यक असते.

**रोजगार निर्मिती :** दुष्काळात हाताला काम नसल्यामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मनरेगा) अंतर्गत कामे उपलब्ध करून देणे.

अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना टप्पा उपाययोजना अल्पकालीन उपाय. टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचे नियोजन व विहिरींचे अधिग्रहण. चारा छावण्यांची उभारणी व पशुखाद्यावर अनुदान. वीज आणि पाणी पट्ट्यात सवलत व शेतीकर्ज वसुलीस स्थगिती.

### दीर्घकालीन उपाय

**जलसंधारण:** जलयुक्त शिवार, शेततळी व सूक्ष्म सिंचन (ठिबक/तुषार) पद्धतींचा वापर.

**पिक पद्धतीत बदल:** कमी पाण्यात येणारी पिके (बाजरी, मूग, उडीद) व हवामान-अनुकूल शेती.भूजल पुनर्भरण: बोअरवेल व विहिरींचे पुनर्भरण करून भूजल पातळी वाढवणे. दुष्काळाच्या या संकटावर मात करण्यासाठी केवळ तात्पुरती मदत पुरेशी नसून, शाश्वत जलव्यवस्थापन आणि शेतकऱ्यांना हवामानबदलाशी जुळवून घेणारे तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे.

# महाराष्ट्रातील भयावह शिक्षण वास्तव व शाळा बंदीचे आंदोलन

जेन झी च्या ऐतिहासिक आंदोलनाने शिक्षणाचा प्रश्न अंजेड्यावर आला आहे. देशभर या प्रश्नाची चर्चा सुरु आहे. आंदोलन होत आहेत. पेपर फुटीपासून सुरु होऊन, स्कुल ठिक करो पर्यंत आंदोलन विकसित झाले आहे. हे आंदोलन विकसित झाले असले तरी, मूळ प्रश्नाकडे अजुन आलेले नाही. महाराष्ट्रातही विविध संघटना आंदोलनात उतरत आहेत. शिक्षक संघटना शाळा बंदीच्या आंदोलनात उतरत आहेत हे स्वागतार्ह आहे. शाळा बंदीचा प्रश्न संवेदनशील झाला आहे. शाळा बंदीची मिमांसा आपआपल्या परीने केली जात आहे. शाळा बंदीच्या बाह्य लक्षाणावर हे आंदोलन होत असले तरी, मूळ कारणांकडे वळतील अशी आशा आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील शिक्षण वास्तव व त्याचे कार्यकारणभाव समजून घेणे आवश्यक आहे.

मागील पाच वर्षातील महाराष्ट्राचे शिक्षण वास्तव भयावह आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणी नंतर महाराष्ट्रात नेमके काय परिणाम झाले? याचा अभ्यास रमेश बिजेकर यांनी शिक्षण नाकारणारे धोरण या पुस्तिकेत केला आहे. शाळा, विद्यार्थी, शिक्षक, भौतिक सुविधा व आर्थिक तरतुद या पाच घटकांच्या आधारे या पुस्तिकेत त्यांनी अभ्यास मांडला आहे. श्री ते ८वी च्या ३६२० शाळा मागील पाच वर्षात बंद झाल्या आहेत. माध्यमिकच्या ३३५ आणि उच्च माध्यमिकच्या १३०६ शाळा वाढल्या आहेत. या वाढीत १०५३ खाजगी शाळांचा समावेश आहे. ८१५२ एकशिक्षकी शाळा आहेत. एकशिक्षकी शाळांच्या वाढीचे प्रमाण ८९ टक्के एवढे प्रचंड आहे. मराठी, इंग्रजी व इतर माध्यमांच्या खाजगी शाळा मागील पाच वर्षात सरासरी ५६ डक्क्यांनी वाढल्या आहेत. यात सर्वाधिक ८६ टक्क्याची वाढ इंग्रजी माध्यमांच्या शाळांची आहे.

मागील पाच वर्षात विद्यार्थ्यांची गळती धक्कादायक आहे. पूर्व प्राथमिक ते १२वी चे एकुण १७लाख ८१ हजार ७४६ विद्यार्थी शिक्षण प्रवाहातून बाहेर फेकले गेले आहेत. यात सरकारी शाळेतील श्री ते ८वी चे १० लाख ८९ हजार ९५२ विद्यार्थी, माध्यमिकचे २ लाख १५ हजार ८६३ विद्यार्थी, उच्च माध्यमिकचे ४७ हजार ३६९ व पूर्व प्राथमिकचे १ लाख ८४ हजार १२६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. खाजगी शाळांच्या विद्यार्थ्यातही घट झाली आहे. पुर्व प्राथमिक ते १२वी पर्यंत २ लाख ५५ हजार २२४ विद्यार्थ्यांनी शाळा सोडली आहे. ही प्रचंड गळती धक्कादायक आहे. याहून धक्कादायक शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या आहे. संभावित लोकसंख्येचा सेन्सस रिपोर्टच्या आधारावर २०२५ ला पुर्व प्राथमिक ते १२वी पर्यंत एकूण ८३ लाख ३६ हजार ६०५ विद्यार्थी शाळाबाह्य ठरतात. यात सर्वाधिक पूर्व प्राथमिकचे ५६ लाख ६३ हजार ८८० मुले शाळाबाह्य आहेत. त्या खालोखाल उच्च माध्यमिकचे १२ लाख २७ हजार ८१८ विद्यार्थी, श्री ते ८वी चे १२ लाख ६८३. माध्यमिकचे २ लाख ४४ हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शाळाबाह्य आणि शाळेतून गळून पडलेल्या विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या शिक्षण व्यवस्थेवर नैतिक प्रश्न उपस्थित करते.

शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तराचे निकष पाळले जात नाही असे दिसून येते. शिक्षण हक्क कायद्याने विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर ठरवुन दिले आहे. त्याचा सोईने वापर केला जातो. मागील १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून शिक्षकांची भरती करण्यात आलेली नाही. मागील पाच वर्षात १ लाखाच्या आसपास शिक्षकांची पदे रिक्त आहेत. अनुदानित शाळेत ९८ हजार ७५६ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत मात्र ६१ हजार ७८२ शिक्षक अतिरिक्त आहेत. सरकारी व अनुदानित यांचा एकत्रित विचार केल्यास ३७ हजार २७४ शिक्षकांची पदे २०२५ ला रिक्त होती. खाजगी शाळांची अवस्था याहून बिकट आहे. खाजगी शाळेत ७२ हजार ६९९ शिक्षकांची पदे रिक्त होती. २०१९-२० ते २०२४-२५ च्या अभ्यासातून विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर पाळले जात नाही हे दिसून आले. २०२५ ला विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर पुढील प्रमाणे होते. सरकारी २३:१, अनुदानित ८८:१ आणि खाजगी ६५:१ असे गुणोत्तर होते. सरकारी व अनुदानित शाळांची रिक्त पदे मागील १० वर्षपेक्ष अधिक काळापासून भरली नाहीत आणि शिक्षकांना अशैक्षणिक कामात गुतवल्या गेले, रिक्त पदे एकशिक्षकी शाळा व अशैक्षणिक कामे यातून सरकारी शाळांची गुणवत्ता घसरवल्या गेली. खाजर्ग शाळांची गुणवत्ता बेताचबेतच असते. या शाळा शिक्षण देण्यासाठी निर्माण झालेल्या नाहीत, तर व्यवसाय करण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. यांची गुणवत्ता आभासी असते. ६५ विद्यार्थ्यास १ शिक्षक हे खाजगी संस्थांचे व्यवसायाचे व आभासी गुणवत्तेचे प्रतिक आहे. नियमांच्या ओझ्याखाली इथले विद्यार्थी गुदमरत आहेत आणि पालक भरमसाठ फी च्या ओझ्याखाली दबत आहेत.

शाळांमधील मूलभूत गरजा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात पूर्ण झाल्या नाहीत. राजकीय ईच्छाशक्तीच्या अभावात दिर्घ काळापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. परंतु २०१९-२० ते २०२४-२५ युडायस रिपोर्ट मध्ये हा प्रश्न गंभीर नसल्याचे दर्शवले आहे. युडायस अहवालात १५ सुविधांपासुन ते २७ सुविधांचा उल्लेख सापडतो. त्यात पाणी, मुलामुलींचे स्वतंत्र प्रसाधनगृह, हात धुण्याची सोय, वीज, आरोग्य तपासणी, वाचनालय, संगणक, इंटरनेट, विशेष गरज प्रसाधन, आधार रॅम्प, अभ्यासक्रम पुरक सोयी, स्वंयपाक खोली, विज्ञान प्रयोगशाळा, सौर उर्जा या मूख्य सुविधांचा उल्लेख आहे. यातील अभ्यासक्रम पुरक सोई, विशेष गरजा प्रसाधन, स्वंयपाक खोली, विज्ञान प्रयोगशाळा, सौर उर्जा या सोई २४ टक्के ते ८१ टक्के शाळांमध्ये उपलब्ध नाहीत. इतर मूलभूत सुविधा ९९ टक्के ते ८२ टक्के शाळांमध्ये उपलब्ध असल्याचे युडायस रिपोर्ट सांगतात. प्रत्यक्ष वास्तव यापेक्षा वेगळे आहे हे अनुभवात येते. शिक्षण हक्क कायद्याने मूलभूत ११ सुविधा बंधनकारक केल्या आहेत. त्यातील ६ सुविधांचा उल्लेख युडायस मध्ये सापडत नाही. शिक्षकनिहाय वर्गखोली, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरात शिक्षकांची उपलब्धता, खेळाचे मैदान, शैक्षणिक व खेळ साहित्य आणि सुरक्षा भिंत या सुविधांचा उल्लेख अहवालात नसल्यामुळे शिक्षण हक्क कायद्याच्या निकषांची पुर्तता झाली की नाही हे अहवालातून स्पष्ट होत नाही. ग्रामिण व शहरी भागातील शाळांना भेटी दिल्या असता, हे प्रश्न दिर्घ काळापासून आवासून उभे आहेत. अत्यंत विदारक स्थिती शाळांची झालेली आहे. शिक्षण हक्क कायद्याच्या किमान मूलभूत सोई मागील १६ वर्षापासून शाळांच्या पुर्ण झालेल्या नाहीत. हा प्रश्न आर्थिक अडचणीचा नाही, तर ईच्छाशक्तीचा आहे. २०१९-२० ते २०२६-२७ पर्यंत महाराष्ट्राचे सकल उत्पन्न (GSDP) दुपटीपेक्षा अधिक वाढले आहे. २०१९-२० ला महाराष्ट्राचे सकल उत्पन्न २६लाख ५६ हजार ८०६ कोटी रुपये होता, तो वाढुन २०२६-२७ ला ५४ लाख ८ हजार ५९४ कोटी रुपये झाला. उत्पन्नाची वाढ दुपटीपेक्षा अधिक आहे. अर्थसंकल्पातील जमा दुपटीपेक्षा अधिक आहे. २०१९-२० ला ३ लाख ९ हजार ८८१ कोटी होता तो वाढुन २०२६-२७ ला ७ लाख ६९ हजार कोटी रुपये झाला. हे उत्पन्न शेतमजुर, कामगारांच्या श्रमातून उभे झाले आहे. परंतू त्याचा परतावा श्रमिकांच्या मुलांच्या सरकारी शाळेला दिले जात नाही. उलट खर्चाची कपात केली जाते. अर्थसंकल्पातील एकुण खर्च ३ लाख ४१ हजार ३२३ पासुन ७ लाख ६९ हजार ४३७ कोटी पर्यंत वाढला. २०१९-२० ला शिक्षणावर ६२ हजार ३५७ कोटी रुपये खर्चाची तरतुद केली होती. २०२६-२७ ला ही रक्कम १ लाख ७ हजार ७०३ कोटी रुपये झाली. प्राथमिक शिक्षणावर ५९ हजार ७४ कोटी ते ८६ हजार ४७ कोटी रुपये पर्यंत तरतुद करण्यात आली.

शिक्षणावरील खर्चाची रक्कम वाढ होताना दिसत असली, तरी ती वाढलेली नसुन कमी करण्यात आलेली आहे. २०१९-२० ला सकल उत्पन्नाच्या २.२४ टक्के रक्कम खर्च होत होती ती घसरुन २०२६-२७ ला १.९९ टक्के झाली आहे. सरकारी शाळांची घट व खाजगी शाळांची वाढ, गळती व शाळाबाह्य विद्यार्थ्यांची मोठीसंख्या, शिक्षकांची रिक्त पदे, भौतिक सुविधांचा अभाव व आर्थिक तरतुदीत कपात नैसर्गिक नाही, तर शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीचा परिणाम आहे. कस्तुरिरंगन समितीचा रिपोर्ट आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये ४२.८ टक्के शाळा बंद करण्याचे संकेत दिलेले आहेत. त्याचा भाग म्हणून शिक्षण विस्ताराचे संकुचितीकरण, शाळा संकुलची व बाजारिकरणाची भूमिका घेतली आहे. ही लढाई धोरणात्मक आहे. शाळा बंदीचा संघर्ष भौतिक संघर्ष आहे. तो हिसकावून घेण्यासाठी शाळेला कुलुप लावले जात आहे. जातवर्ग व्यवस्थेचे हितसंबंध एकात्म आहे. म्हणून शाळा बंदी विरोधी लढाई शोषीतांच्या भौतिक हितसंबंधाची एकात्म लढाई आवश्यक बनते. महाराष्ट्रात ५ आक्टोंबर पासुन मुंबईत धरणे आंदोलन सुरु करण्याचा निर्धार झाला आहे. लक्षणांपासून सुरु होत असलेले है आंदोलन शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणाची भूमिका घेऊ समग्र व सातत्यपुर्ण होईल ही आशा आहे.

रमेश बिजेकर
वाशीम..

# बॅलेट पेपरवर निवडणुकांसाठी राज्यभरात जनआंदोलन व्हावे!

## राज ठाकरे : निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभारावरून आणि एसआयआर प्रक्रियेवरून देशाच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निर्णयावर दोन निवडणूक आयुक्तांनी सलग १४ वेळा ऑन रेकॉर्ड आक्षेप घेतल्याची बातमी समोर आल्यानंतर, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. निवडणूक आयोगाची स्वायत्तता केवळ कागदावरच उरली असून, या सर्व प्रकरणामागील खऱ्या सूत्रधाराची चौकशी झाली पाहिजे, तसेच व्होटींग मशीनऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यासाठी मोठे जनआंदोलन उभे व्हायला हवे, असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले. तसेच महाराष्ट्रासह देशभरात मॅच फिक्सिंग करून निवडणुका जिंकल्या गेल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

निवडणुकीच्या कारभारावर बोट ठेवताना त्यांनी मतदार नोंदणी, नावे वगळणे आणि मतदारयादीच्या सॉफ्टवेअरशी संबंधित महत्त्वाचे आदेश आयोगाच्या मंजुरीशिवाय काढण्यात आल्याचे राज ठाकरे यांनी म्हटलं. तसेच फॉर्म ६ मधील अर्जदाराचे किंवा कुटुंबीयांचे नाव मागील यादीत होते का, हे विचारण्याचा अधिकार आयोगाला नसतानाही तो वापरण्यात आला. स्थानिक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांची शक्ती पूर्णपणे काढून घेत सॉफ्टवेअरमध्ये फेरफार करण्यात आल्याचे राज ठाकरे म्हणाले. पश्चिम बंगालमध्ये स्थानिक अधिकाऱ्यांनी समाविष्ट केलेल्या मतदारांविरुद्ध आयोगाच्या वतीने तब्बल १६.१० लाख अपील दाखल करण्यात आले, ज्यामागे मोठा गैरप्रकार असल्याचा संशय असल्याचेही राज ठाकरेंनी म्हटलं.

राज ठाकरे यांनी स्पष्ट केले की, ज्ञानेश कुमार यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये पदभार स्वीकारल्यापासून बिहार, आसाम, केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुका झाल्या, तर महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. या सगळ्या निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाने दिल्लीच्या तालावर नाचत मनमानी केली असून, हा एक प्रकारे 'मॅच फिक्सिंग'चा खेळ होता, जो आता पुराव्यानिशी सिद्ध झाला आहे.

### ...तर ही लढाई अंतहीन आहे!



राज ठाकरे यांनी विरोधकांना एक नवी दिशा आणि कठोर पावले उचलण्याचे आवाहन केले आहे. 'आयोगाला हाताला धरून एसआयआर आणि मतदार याद्या यात घोटाळे करून भाजपने निवडणुका कशा जिंकल्या हे आता दिसलंच आहे. स्वायत्त नसलेला निवडणूक आयोग आणि ईव्हीएम ही भाजप सरकारची दोन प्रमुख अस्त्रे आहेत. जर निवडणूक आयोग अपेक्षेप्रमाणे स्वायत्त झाला तर आणि तरच सत्ताधाऱ्यांना जमिनीवर आणता येईल हेच अंतिम सत्य आहे हे सगळ्यांनी लक्षात घ्या नाहीतर ही लढाई अंतहीन आहे,' असंही राज ठाकरे म्हणाले.

# अणुशस्त्रांवरील वैज्ञानिक संशोधनाचा विस्तार करणारे अणुशास्त्रज्ञ

## राजा रमण्णा यांचा आज स्मृतिदिन

राजा रमण्णा यांचा जन्म २८ जानेवारी १९२५ मध्ये झाला असून, ते एक भारतीय अणुभौतिकशास्त्रज्ञ होते. ते १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला भारताच्या अणुकार्यक्रमाचे संचालक होते, ज्याची परिणती १८ मे १९७४ रोजी झालेल्या भारताच्या पहिल्या यशस्वी अणुशस्त्र चाचणी ,'स्मायलिंग बुद्धा' मध्ये झाली .

रमण्णा यांनी मद्रास विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात पदवी आणि लंडनच्या किंग्ज कॉलेजमधून पीएचडी मिळवली . अणुभौतिकशास्त्रावर काम करण्यासाठी ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि नंतर भाभा अणुसंशोधन केंद्रात रुजू झाले. रमण्णा यांनी होमी जहांगीर भाभा यांच्या हाताखाली काम केले, ज्यांना ते १९४४ मध्ये भेटले होते. ते १९६४ मध्ये अणुकार्यक्रमात सामील झाले आणि नंतर १९६७ मध्ये या कार्यक्रमाचे संचालक बनले. रमण्णा यांनी अणुशस्त्रांवरील वैज्ञानिक संशोधनाचा विस्तार केला आणि त्याचे पर्यवेक्षण केले. तसेच, भाभा अणुसंशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांच्या त्या चमूचे ते प्रमुख होते, ज्यांनी १९७४ मध्ये पहिल्या अणुबॉम्बची रचना करून त्याची चाचणी केली. रमण्णा चार दशकांहून अधिक काळ भारताच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित होते आणि त्यांनी भारतीय सशस्त्र दलांसाठी संशोधनालाही चालना दिली. त्यांनी भारत सरकारमध्ये संरक्षण संशोधन सचिव, संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार, संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे महासंचालक, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव अशा विविध पदांवर काम केले. पुढे १९९० मध्ये ते संरक्षण राज्यमंत्री झाले. त्यांनी १९९७ ते २००३ पर्यंत राज्यसभेचे खासदार म्हणून काम केले. त्यांच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात, त्यांनी अणुप्रसार आणि अणुचाचण्यांविरुद्ध भूमिका घेतली.



रमण्णा विविध शैक्षणिक संस्थांशी संबंधित होते. ते नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीजचे संस्थापक-संचालक होते आणि त्यांनी आयआयटी मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्यांना विविध विद्यापीठांकडून अनेक मानद डॉक्टरेट पदव्या प्रदान करण्यात आल्या होत्या. त्यांना १९७५ मध्ये भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान, पद्मविभूषण , प्रदान करण्यात आला. रमण्णा यांचे २४ सप्टेंबर २००४ मध्ये मुंबईत वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले.

राजा रामण्णा यांचा जन्म २८ जानेवारी १९२५ रोजी ब्रिटिश भारतातील म्हैसूर संस्थानातील टिपटूर ( आता तुमकूर जिल्हा , कर्नाटक , भारत) येथे रुक्मिणी आणि रामण्णा यांच्या पोटी झाला. त्यांचे वडील न्याय विभागात कार्यरत होते. रामण्णा यांनी दावा केला की, त्यांच्या आईची बहीण राजम्मा, जी एक सरकारी शिक्षिका होती, तिचा त्यांच्यावर प्रभाव होता. बंगळूरमधील बिशप कॉटन बॉईज स्कूलमध्ये जाण्यापूर्वी त्यांनी म्हैसूरमधील दालवॉय स्कूल आणि गुड शेफर्ड कॉन्व्हेंटमध्ये आपले सुरुवातीचे शिक्षण घेतले . रामण्णा यांना लहानपणापासूनच संगीताची आवड होती आणि त्यांनी वयाच्या सहाव्या वर्षी पियानोचे धडे घ्यायला सुरुवात केली. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांनी म्हैसूरच्या महाराजांसमोर ऑडिशन दिली. नंतर त्यांनी मद्रास ख्रिश्चन कॉलेजमध्ये शिक्षण घेतले , जिथे त्यांनी १९४५ मध्ये मद्रास विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात बीएससी पदवी प्राप्त केली. रमन्ना यांनी मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी मिळवली. १९४९ मध्ये, त्यांनी टाटा ग्रुपच्या शिष्यवृत्तीवर लंडनमधील किंग्ज कॉलेजमधून अणुभौतिकशास्त्र विषयात पीएचडी पूर्ण केली.

# संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेतील कामांवर गंभीर आक्षेप

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**पातूर :** संत सेवालाल महाराज बंजारा/लमान तांडा समृद्धी योजनेंतर्गत बार्शीटाकळी, पातूर व मूर्तिजापूर तालुक्यांत मंजूर झालेल्या सुमारे ३ कोटी ७० लाख रुपयांच्या विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मंजूर आराखड्यानुसार कामे न करता काही ठिकाणी मनमानी पद्धतीने लोकेशन व अंदाजपत्रकात बदल करण्यात आल्याचा दावा करीत या कामांची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करूनच उर्वरित निधी वितरित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याबाबत गोपाल परशराम चव्हाण, सरपंच तथा अशासकीय सदस्य, संत सेवालाल महाराज बंजारा/लमान तांडा समृद्धी योजना, जिल्हा परिषद अकोला यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे १६ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदन साद केले आहे.

निवेदनात करण्यात आलेल्या आरोपानुसार, काही तांड्यांमध्ये मंजूर केलेले लोकेशन टाळून सोयीच्या ठिकाणी कामे घेण्यात आली. काही ठिकाणी ३ मीटर रुंदी व ८० मीटर लांबीच्या रस्त्याचे अंदाजपत्रक असताना प्रत्यक्षात ६ ते ७ मीटर रुंदीचे रस्ते करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित सरपंच अथवा त्यांच्या नातेवाईकांच्या घरांना फायदा होऊन गरजू कुटुंबांच्या घरापर्यंत रस्ते व नाल्यांची सुविधा पोहोचली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

### जुन्याच रस्त्यांवर पुन्हा काम केल्याचा आरोप

काही तांड्यांमध्ये यापूर्वीच विविध योजनांतून सिमेंट काँक्रीट, डांबरीकरण किंवा खडीकरणाची कामे झालेली असताना त्याच रस्त्यांवर पुन्हा संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेतून कामे करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच काही ठिकाणी अंदाजपत्रकानुसार खोलीकरण न करता जुन्याच रस्त्यावर सिमेंट काँक्रीटचे दोन थर टाकून काम पूर्ण करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामाची गुणवत्ता, मोजमाप आणि अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष काम झाले आहे की नाही, याची जबाबदारी संबंधित अभियंत्यांची असतानाही पुरेशी तपासणी झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**अंदाजपत्रकातील तफावतीची चौकशी करण्याची मागणी**

आमदार निधी, खासदार निधी तसेच संत सेवालाल महाराज बंजारा/लमान तांडा समृद्धी योजनेतील समान स्वरूपाच्या कामांच्या अंदाजपत्रकांमध्ये मोठी तफावत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या अंदाजपत्रकांची वरिष्ठ स्तरावरून तुलना करून चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### निधी वितरणावरही प्रश्नचिन्ह

योजनेच्या निधी वितरणाबाबतही निवेदनात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. काही ग्रामपंचायतींमध्ये कामांसाठी ४० टक्के रक्कम अदा करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, उर्वरित ६० टक्के निधी कामांची स्वतंत्र तपासणी झाल्याशिवाय वितरित करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रत्येक तांड्यातील कामांची तपासणी करण्यासाठी संबंधित यंत्रणेतील नियमित अधिकाऱ्यांऐवजी स्वतंत्र अभियंत्यांची समिती नियुक्त करून प्रत्यक्ष मोजमाप व दर्जा तपासणी करावी, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

# खरिप शिवार फेरी- 2026 मध्ये कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाला शेतकऱ्यांचा उस्तूर्फ प्रतिसाद




प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग, तसेच प्रकल्प संचालक, आत्मा तर्फे २० ते २२ सप्टेंबर असे तीन दिवसीय "खरीप शिवार फेरी-२०२६" चे आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत झाले. महाराष्ट्र विधानसभेचे मुख्य प्रतोद रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, कृषी सचिव परिमल सिंह, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य, विधान परिषद व विधानसभा सदस्य, महाराष्ट्राचे कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे महासंचालक राहुल माहीवाल तसेच विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे प्रतिनिधी खरीप शिवार फेरी-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते.

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाच्या थेट प्रात्यक्षिकांचा समावेश या शिवार फेरी मध्ये करण्यात आला होता. या शिवार फेरी दरम्यान कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पास शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. शिवार फेरी-२०२६ मध्ये कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पामध्ये कोरडवाहू शेती मधील पावसातील दीर्घकाळ खंड पडल्यानंतर आपत्कालीन पिक नियोजन याचे पिक प्रत्याक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले जेणेकरून शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होईल. डॉ. अनिता चोरे, प्रमुख शास्त्रज्ञ यांनी दुष्काळी परिस्थितीत प्रमुख कोरडवाहू पिकांचे आपत्कालीन पीक व्यवस्थापन, दीर्घकाळ पाऊस न झाल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी होऊन निर्माण होणाऱ्या ताणाचा पिकांवर होणारा प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. राजेश पातोडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ मृद व जल संधारण यांनी शेतकऱ्यांना पावसाचे पाणी संवर्धनाच्या विविध तंत्रज्ञान, अतिवृष्टी मध्ये पाण्याचा निचरा, शेततळे व सूक्ष्म सिंचनाच्या पद्धती या बद्दल प्रत्याक्षिकांद्वारे शेतकरीवर्ग यांना माहिती दिली. डॉ. महिपाल गणवीर, वरिष्ठ शास्त्रज्ञ कृषिविद्या यांनी आंतरपीक पद्धती बद्दल माहिती दिली.

शिवार फेरीचे यशस्वीरित्या आयोजन करण्याकरिता कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे विशाल पांडागळे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक, कु. वैष्णवी शर्मा, कनिष्ठ संशोधन सहाय्यक चंद्रमणी खंडारे, कृषी सहाय्यक व पवन फुकट यांनी परिश्रम घेतले.

# महिला शेतकरी प्रमाणपत्र पोर्टल सुरु

**अकोला :** राज्यातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध कल्याणकारी कार्यक्रमांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी २२ जुलै रोजी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत महिला शेतकऱ्यांना मान्यता देणे, महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे आणि महिला शेतकऱ्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करणे आदी कार्य होणार असून याव्दारे महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळवून देण्यात आली आहे.

# आर्थिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांचा अपमान का?

**अकोट :** शहरातील काही खासगी कोचिंग क्लासेसमध्ये फी भरण्यास उशीर झाल्यास विद्यार्थ्यांना वर्गातून परत पाठवले जात असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. आर्थिक परिस्थितीमुळे फी भरण्यास विलंब झाल्यास विद्यार्थ्यांना इतरांसमोर अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याची तक्रारही पालकांकडून करण्यात येत आहे.

फी वसुली हा संस्थेचा आर्थिक विषय असला, तरी आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारची वागणूक देणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांचा सन्मान आणि मानसिक सुरक्षितताही महत्त्वाची आहे. दरम्यान, क्लासेसमध्ये Fire Safety, कार्यरत CCTV, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि प्राथमिक उपचाराची सुविधा उपलब्ध आहे का, याचीही संबंधित विभागाने तपासणी करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

# ग्रामीण साजाने नटला शर्मांचा बाप्पा

## पर्यावरणपूरक सजावटीसह वारकरी संप्रदायाचे दर्शन



प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला :** शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासह अनेक मान्यवरांकडे देखील बाप्पांच्या आकर्षक सजावटीने नागरिकांचे लक्ष वेधले आहे. शास्त्री नगरातील प्रख्यात व्यवसायी प्रा. पी. के. शर्मा यांच्या धर्मपत्नी नीता शर्मा यांनी यंदा आपल्या बाप्पाची सजावट अगदी पर्यावरणपूरक पद्धतीने केली असून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडत आहे.

नीता शर्मा या दरवर्षी आपल्या बाप्पाची आकर्षक पद्धतीने सजावट करतात. यंदा त्यांनी बाप्पाच्या सजावटीत बांबूचा वापर केला आहे. बांबूच्या काठ्यांपासून बनविलेली झोपडी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवित आहे. बांबुच्या काठ्यांनी बनविलेली आकर्षक झोपडी त्यावर नैसर्गिक साहित्यापासून साकारलेले छत आणि पारंपारिक दिव्यांचा वापर करुन केलेली रोषणाई पाहणा-यांचे लक्ष वेधून घेत आहे. पर्यावरणपुरक गणेशोत्सवासह ग्रामीण संस्कृतीची झलक त्यांच्या देखाव्यातून यंदा झळकत आहे.

### वारकरी परंपरेचे दर्शन

महाराष्ट्राला समृद्ध अशी वारकरी परंपरा लाभली असून शर्मा यांच्या बाप्पांच्या सजावटीतून दिंडी, टाळ, मृदंग आणि विठ्ठलभक्तीची झलक देणारा देखावा लक्षवेधी ठरत आहे. भक्ती आणि संस्कृतीचा सुंदर मिलाप यात घडत असून पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करावा म्हणून शाडू मातीच्या गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. त्याशिवाय सजावट साहित्यातही पर्यावरणपुरक साहित्याला प्राधान्य देण्यात आले आहे.

# दोन स्पीकरच्या मर्यादेत गणेशोत्सव; कर्णकर्कश डीजे वाजवल्यास कारवाई

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

## एसपी चांडक यांचा इशारा




**अकोट :** अकोट शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शांतता समिती व गणेश मंडळांची संयुक्त बैठक श्रीहरी हॉटेल येथे पार पडली. यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी गणेश मंडळांना ध्वनिमर्यादेचे पालन करून केवळ दोन स्पीकर वापरण्याच्या सूचना दिल्या.

विसर्जन मिरवणुकीत कर्णकर्कश डीजे, अतितीव्र साउंड सिस्टिम किंवा नियमबाह्य ध्वनियंत्रणांचा वापर केल्यास संबंधित गणेश मंडळ व डीजे चालकावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा एसपी चांडक यांनी दिला.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी अतितीव्र ध्वनी निर्माण करणाऱ्या यंत्रणांवर निर्बंध घातले आहेत. हा आदेश 11 सप्टेंबर ते 1 नोव्हेंबर 2026 रोजी रात्री 12 वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

उत्सव साजरा करताना नागरिक, रुग्ण व ज्येष्ठांना ध्वनीप्रदूषणाचा त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीला एसपी अर्चितजी चांडक, एसडीपीओ निखिलजी पाटील, एसडीओ मनोजजी लोणारकर, तहसीलदार सुनीलजी चव्हाण, मुख्याधिकारी शशिकांतजी बाबर, ठाणेदार किशोरजी जुनघरे यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी व शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते.

# एआयटीएससीमध्ये अकोटच्या दोन एनसीसी कॅडेट्सचा गौरव




वि. प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोट :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातील एसयूओ रितेश गौतम तायडे व जेयूओ संदेश मारोती कुमरे यांनी दिल्ली येथे झालेल्या ऑल इंडिया थल सैनिक कॅम्प मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत कलर कोट प्राप्त केला.

रितेश तायडे याने ऑबस्टॅकल ट्रेनिंगमध्ये प्रथम, तर संदेश कुमरे याने मॅप रीडिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढविला. या यशाबद्दल महाविद्यालयात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील पांडे होते. उपप्राचार्य डॉ. अशोक इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ. पांडे यांनी दोन्ही कॅडेट्सचे अभिनंदन करत त्यांच्या मेहनत, शिस्त व जिद्दीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन एनसीसी सीटीओ डॉ. अश्विनी फोकमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. साक्षी घायल हिने केले.

# समतादूत देणार योजनांची माहिती

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला :** सामाजिक न्याय विभागामार्फत समतादूतांच्या सहकार्याने योजनांच्या माहितीचा प्रसार, लाभार्थ्यांचा शोध व पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणे ही कामे सुरू करण्यात आली आहेत. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करणे, संबंधित विभागांशी समन्वय साधणे तसेच नागरिकांना प्रत्यक्ष शासकीय सेवा व योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करणे हा आहे. जिल्हा माहिती कार्यालयाच्या लोकसंवाद कार्यक्रमही यात संलग्न असून, अधिकारी व कर्मचारी तसेच सर्व तहसील कार्यालये, पंचायत समित्या, महानगर पालिका, नगरपरिषदा, शाळा, महाविद्यालये, निवासी शाळा, वसतिगृहे तसेच इतर संबंधित शासकीय कार्यालये व आस्थापनांच्या आवश्यक सहकार्याने सर्व समतादूतांनी कार्यक्रम पार पाडण्याचे निर्देश सहायक आयुक्त यांनी दिले आहेत.

# न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात गणेश उत्सव



प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला :** १९२७ साली युगपुरुष ,स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या अकोला एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

पर्यावरण पूरक गणेशाची स्थापना करण्यात आली.

झाडे लावा- झाडे जगवा, बेटी बचाओ- बेटी पढाओ , प्लास्टिकचा वापर टाळा. प्लॅस्टिक हे आरोग्यासाठी हानिकारक आहे अशा प्रकारचे संदेश देण्यात आले. लोकमान्य टिळकांनी कोणत्या उद्देशाने सार्वजनिक गणेश उत्सव सुरू केला याबाबत प्रबोधन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती न बसवता मातीचीच मूर्ती स्थापित करावी असा मौल्यवान संदेश देण्यात आला. शाळेची श्री गणेशाची मूर्ती ही शाळेचाच ८ विचा विद्यार्थी मोहित गाते याने मातीत घडवली आहे.शाळेच्या गणेश उत्सवाच्या सजावटीमध्ये कागद ग्लिटर पेपर, कापड यांचा प्रामुख्याने उपयोग केला आहे.

# आंबोड्यात दासगिरी महाराजांना भावपूर्ण निरोप

## गाव प्रदक्षिणेनंतर समाधी विधी संपन्न; हजारो भक्तांच्या उपस्थितीत अंतिम दर्शन





वि. प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोट :** अकोट तालुक्यातील आंबोडा येथील कृष्णाई गौरक्षण सेवा समितीचे प्रमुख महंत सुरेश्वरानंद उर्फ दासगिरी महाराज यांचे अल्पशा आजाराने शनिवारी (ता. १९) दुपारच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच अकोटसह परिसरातील तसेच विविध जिल्ह्यांतील असंख्य भक्तांनी आंबोडा येथे धाव घेतली. रविवारी (ता. २०) सकाळी गाव प्रदक्षिणेनंतर मोठ्या भक्तिभावात आणि भावनिक वातावरणात त्यांच्यावर समाधी विधी पार पाडण्यात आला.

मूळचे अमरावती जिल्ह्यातील मोताळी येथील रहिवासी असलेले दासगिरी महाराज गेल्या २० ते २२ वर्षांपासून आंबोडा येथे वास्तव्यास होते. त्यांनी येथे कृष्णाई गौरक्षण सेवा समितीची स्थापना करून गोसंवर्धन आणि गौरक्षणाचे कार्य उभारले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या गौरक्षण केंद्रामुळे त्यांना परिसरात विशेष मान्यता आणि मोठा भक्तपरिवार लाभला होता. दासगिरी महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची मोठी गर्दी झाली होती. रविवारी सकाळी ५ ते १० वाजेपर्यंत अंतिम दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या श्रद्धास्थानाला अखेरचा निरोप दिला. त्यानंतर सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान गाव प्रदक्षिणा काढण्यात आली. महाराजांच्या पार्थिवाच्या दर्शनासाठी आणि प्रदक्षिणेत सहभागी होण्यासाठी आंबोडा गावासह परिसरातील अनेक गावांमधून भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. "दासगिरी महाराज अमर राहो"च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. अनेक भक्तांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते.

गाव प्रदक्षिणेनंतर धार्मिक विधी आणि मंत्रोच्चारांच्या वातावरणात समाधी विधी संपन्न करण्यात आला. या वेळी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता. भक्तांनी पुष्पचक्र अर्पण करून महाराजांना श्रद्धांजली वाहिली. संपूर्ण परिसरात शोकमय वातावरण असतानाही भक्तांनी अत्यंत श्रद्धा, भक्तिभाव आणि उत्साहाने समाधी सोहळ्यात सहभाग नोंदविला.

दासगिरी महाराजांच्या निधनामुळे आंबोडा येथे मोठ्या प्रमाणात भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला होता. वाहतूक नियंत्रणासह कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस कर्मचारी सतर्क होते.

दासगिरी महाराज यांच्या निधनामुळे गौरक्षण, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेकांना मोठा धक्का बसला असून, त्यांच्या जाण्याने परिसराने एक सेवाभावी संत आणि गोभक्त व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना भक्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# पणज श्री महालक्ष्मी यात्रेत भाविकांचा उसळला अलोट जनसागर



प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोट :** अकोट तालुक्यातील पणज येथील जागृत व पुरातन देवस्थान श्री महालक्ष्मी मातेच्या महाराष्ट्र मध्ये साक्षात्काराने नाव लौकिक आहे दूर दूर वरून येणाऱ्या भाविकांचा यात्रेत शुक्रवारी विशेष महिला भाविकांचा गर्दीचा जनसागर उसळला होता. त्रिवेणी संगमावर स्थित बोर्डी नदीकाठी वसलेल्या शहापूर वाघोळा प्रकल्पाच्या निसर्ग रम्य पाण्याच्या जुन्या रोडवरून दर्शनासाठी येत असताना पुलावरून पाण्याचे निसर्गरम्य वातावरण व मंदिराच्या बाजूला असलेले प्राचीन काळाची दीपमाला हे आजही साक्ष देत आहे भाविकांना मंदिरात येण्याकरिता दोन्ही बाजूने आयोजक समितीकडून नदीच्या किनाऱ्याला लांबलचक दोरांला भगवे झेंडे बांधून सुरक्षा व रस्त्यावर साफसफाई स्वच्छता करून येण्या-जाण्याकरिता रस्ता सुरक्षित तयार होता भाविकांचा दरवर्षीपेक्षा वाढता संख्येचा महापूर वाढता पाहत यावर्षी दर्शन बारी ऊन पाऊस मंडपाची व्यवस्था व पिण्याचे पाण्याची व्यवस्था व आरोग्य विभागाचे डॉक्टरांचा चमू दाखल केले होते पुरातन पौराणिक दरवर्षी गौरी पूजनानिमित्त भव्य यात्रेचे आयोजन केले जाते. पंचक्रोशीतून हजारोच्या संख्येत भाविकांसह माहेरवाशिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन महालक्ष्मी मातेचे दर्शन बारी मध्ये लागून दर्शनाचा लाभ घेत व महाप्रसादाचा लांबलचक रांगा लागल्या होत्या यावेळी अत्यंत नियोजनबद्ध महाप्रसादाचे वाटप भाविक तरुण पिढीकडून करण्यात आले व भाविकांना महाप्रसाद हा बसून जेवण करण्यासाठी मोठ्या सभा मंडप ची व्यवस्था केली होती यावेळी मंदिर परिसर मातेच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

# पावसाच्या सरींनी शहरवासीयांना दिलासा

**अकोला :** जवळपास महिन्यापासून नागरिक पावसाच्या प्रतीक्षेत असतानाच बुधवारी दुपारच्या सुमारास अचानक पावसाच्या सरी कोसळल्याने शहरवासीयांना उकाड्यापासून काही काळ दिलासा मिळाला होता. मात्र या अचानक आलेल्या पावसाने घरगुती गणेशोत्सवानिमित्त असलेल्या महाप्रसाद ठेवणाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली होती. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे उकाडा भयंकर जाणवतो आहे, पावसाची आवश्यकता सर्वांनाच आहे.

## निधन वार्ता

**जुगलकिशोरजी चांडक**



**पातुर्डा :** येथील कपिल चांडक याचे वडील जुगलकिशोरजी मुलतानचंदजी चांडक यांचे वयाच्या 74 वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे 1 मुलगा, 1 मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# दिग्रस येथे गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**दिग्रस :** दिग्रस शहरातील मोठा मारोती मंदिर परिसरातील एका इसमाने आपल्या राहत्या घरी खिडकीला लुंगी बांधून गळफास घेतल्याची घटना दि.२३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता उघडकीस आली.

रवी नामदेवराव बेदरकर (वय - ५७) वर्ष रा.मोठा मारुती मंदिर दिग्रस असे मृतकाचे नाव आहे. मृतक हा घरी एकटाच राहत होता. अशातच त्याने घरातच गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच घटनास्थळी पंचनामा करून शवविच्छेदनासाठी



मृतदेह ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. सदर इसमाने गळफास का घेतला हे समजु शकले नाही. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनात रवी जगताप, रामराव आडे करीत आहे.

# शेतकऱ्यांसाठी उबाठा सेनेचा एल्गार

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**यवतमाळ :** नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही अटी-शर्ती न लावता सरसकट मदत द्यावी, अशी मागणी करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने गुरुवारी यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

आझाद मैदानातून सुरू झालेल्या या मोर्चाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. यावेळी पक्षाचे उपनेते आमदार नितीन देशमुख यांनी सरकारला शेतकरी प्रश्नावरून आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला.

राज्यातील शेतकरी नैसर्गिक संकटे, पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे संकटात आहे. त्यामुळे सरकारने समित्या व उपसमित्यांच्या माध्यमातून निर्णय लांबविण्याऐवजी तातडीने मदत जाहीर करावी, अशी भूमिका







देशमुख यांनी मांडली. सरसकट दुष्काळ जाहीर करून प्रत्येक बाधित शेतकऱ्याला प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली. तसेच शेतमजुरांनाही २५ हजार रुपयांची मदत देण्याची मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी अटी-शर्ती लावू नयेत. कर्जमाफीही कोणत्याही अटीशिवाय सरसकट करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## मदत न मिळाल्यास समृद्धी महामार्ग रोखण्याचा इशारा

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास विदर्भातून जाणारा समृद्धी महामार्ग शेतकऱ्यांसह बंद पाडण्याचा इशारा देशमुख यांनी दिला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अकोला दौऱ्यावरही देशमुख यांनी टीका केली. शेतकऱ्यांच्या शेतांची पाहणी करताना महामार्गालगतच्या शेतांपुरते मर्यादित न राहता गावागावांत जाऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. केवळ प्रसिद्धी माध्यमांसमोर पाहणी करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्यासाठी त्यांच्या बांधावर जावे, असे ते म्हणाले.

कोरडा दुष्काळ जाहीर करून प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये अनुदान, पीक विमा योजनेतील पूर्वीचे चार ट्रिगर पूर्ववत करणे, नुकसानग्रस्त पिकांची पूर्ण भरपाई, रब्बी हंगामासाठी मोफत बियाणे व खते आणि शेतीसाठी २४ तास वीजपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली.

कृषी पंपांना केवळ सौरऊर्जेवर अवलंबून न ठेवता पूर्वीप्रमाणे नियमित वीज जोडणी द्यावी. नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. पुनर्गठित कर्ज असलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही

### प्रमुख मागण्या

- सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करावा. प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. शेतमजुरांना २५ हजार रुपये मदत द्यावी. पीक विम्याचे चार ट्रिगर पूर्ववत करावेत. रब्बीसाठी मोफत बियाणे व खते द्यावीत. शेतीसाठी २४ तास वीजपुरवठा करावा. कोणत्याही अटीशिवाय सरसकट कर्जमाफी करावी.

कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या मोर्चात आमदार संजय देरकर, लोकसभा संपर्कप्रमुख दिलीप जाधव, जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, किशोर इंगळे, संजय निखाडे, पश्चिम विदर्भ महिला आघाडी संघटिका सागरपुरी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कल्पना दरवई, जिल्हा सचिव तुषार देशमुख, उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत उडाके, तालुकाप्रमुख निलेश लडके, शहरप्रमुख चेतन शिरसाट, राजेंद्र कोहरे, युवा सेना जिल्हाप्रमुख गिरीजानंद कळंबे, अनिकेत आडे, बाबू पाटील जैत, प्रवीण पवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### 'बांधावर जाऊन पाहणी करा'

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अकोला दौऱ्याचा संदर्भ देत आमदार नितीन देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी करण्याची मागणी केली. महामार्गालगतच्या शेतांची पाहणी करण्याऐवजी गावागावांत जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधावा, त्यांच्या अडचणी ऐकाव्यात आणि त्यानुसार मदतीचा निर्णय घ्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

# दुचाकीसह आरोपी गजाआड

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**दारव्हा :** शासकीय रुग्णालयाच्या परिसरातून चोरलेली दुचाकी विकण्याच्या तयारीत असलेल्या एका चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने दारव्हा शहरात सापळा रचून रंगेहात पकडले. त्याच्याकडून २५ हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. आकाश शिवाजी शिंदे (वय २९, रा. बागवाडी, ता. दारव्हा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेंद्री येथील अरुण राऊत यांची होन्डा शाईन (MH-29-BT-4939) दुचाकी ११ सप्टेंबर रोजी दारव्हा येथील



सरकारी रुग्णालयातून चोरीला गेली होती. याप्रकरणी दारव्हा पोलिसांत गुन्हा नोंदवून एलसीबी पथक समांतर तपास करत होते. २२ सप्टेंबर रोजी गस्तीदरम्यान संशयित आरोपी दुचाकी विकण्यासाठी आल्याची गुप्त माहिती एलसीबीला मिळाली. शहरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गाडी चोरल्याची कबुली दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, एलसीबीचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय शिवशंकर कायंदे, सोहेल मिर्झा, कुणाल मुंडोकार, सचिन मलाये, पवन ढवळे व अमित कुमरे यांनी केली.

# विजयसिंह राठोड यांची तालुका अध्यक्षपदी निवड

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**आर्णी :** ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या आर्णी तालुका अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह राठोड यांची निवड करण्यात आली. यवतमाळ येथे आयोजित चर्चासत्रात संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी. सी. राठोड यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली. समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चासत्रात विचारविनिमय करण्यात आला. सामाजिक एकोपा, संघटनात्मक बळकटी आणि समाजाच्या विकासासाठी कार्य करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

कार्यक्रमाला संघाचे प्रदेशाध्यक्ष बापूराव राठोड, राष्ट्रीय कोषाध्यक्ष



एन. टी. जाधव, राष्ट्रीय महासचिव ॲड. जगदीश पवार, जिल्हाध्यक्ष प्रा. डी. एस. चव्हाण, महिला जिल्हाध्यक्षा पूजा राठोड, डॉ. वर्षा चव्हाण यांच्यासह समाजबांधवांची उपस्थिती होती. विजयसिंह राठोड यांच्या निवडीबद्दल समाजबांधवांनी त्यांचे अभिनंदन केले. संघाच्या माध्यमातून समाजाच्या विविध प्रश्नांसाठी सक्रियपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वृद्धेचे मंगळसूत्र हिसकावून पळणाऱ्या आरोपीला नागरिकांनी पकडले

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**यवतमाळ :** वाढदिवसाचा आनंद साजरा करून घरी परतणाऱ्या एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पळणाऱ्या चोरट्याला नागरिकांनी पाठलाग करून रंगेहात पकडल्याची थरारक घटना यवतमाळ येथील अमृत गार्डनबाहेर घडली. नागरिकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकला असून अवधुतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिव्हील लाईन परिसरातील शर्मा वाडा येथे राहणाऱ्या सुरेखा विष्णू उंबरकर (वय ६५) या २२ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास पतीसह वडगाव रोडवरील 'अमृत गार्डन' येथे मैत्रिणीच्या ७५ व्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. दुपारी २:३० वाजेच्या सुमारास कार्यक्रम आटोपून त्या कारमध्ये बसत असतानाच, अचानक एका अनोळखी भामट्याने त्यांच्याजवळ येऊन गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावले.

मंगळसूत्रातील ८ ग्रॅम वजनाचे पेंडॉल आणि काही भाग (किंमत सुमारे ३० हजार रुपये) तोडून आरोपी पळू लागला. सुरेखा उंबरकर यांनी तात्काळ आरडाओरड केली असता, परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत चोरट्याचा पाठलाग केला आणि त्याला जागीच पकडले. नागरिकांनी घटनेची माहिती तात्काळ पोलिसांना दिली.

अवधुतवाडी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आपले नाव सुजित विनायक पवार (वय २७, रा. अंजी नाईक, ता. आर्णी, जि. यवतमाळ) असे सांगितले. सुरेखा उंबरकर यांच्या तक्रारीवरून अवधुतवाडी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा (अप.क्र. १४४८/२०२६) दाखल केला असून पुढील तपास पोउपनि सुरज जगताप करत आहेत.

# बंद पडलेली कृषी केंद्रे पुन्हा सुरू करणार

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

## शेतकऱ्यांना वाजवी दरात खते-बियाणे देणार : खरेदी-विक्री संघाचा निर्णय

**उमरखेड :** तालुक्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार रासायनिक खते व बियाणे वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासाठी बंद पडलेली खरेदी-विक्री संघाची कृषी केंद्रे पुन्हा सुरू करण्यात येणार आहेत. साखरा, उमरखेड आणि ढाणकी येथील कृषी केंद्रे पुनर्जीवित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती संघाचे अध्यक्ष सुदर्शन रावते पाटील यांनी दिली. खरेदी-विक्री संघाच्या ६५ व्या वार्षिक आमसभेत ते बोलत होते.

आमसभेत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तालुक्यातील पावसाची परिस्थिती लक्षात घेता शासनाने तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा, तसेच



मागील वर्षाचा प्रलंबित पीकविमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, असा ठराव घेण्यात आला. पावसातील खंडामुळे शेतीचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी संस्थेच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली.

मागील तीन वर्षांत साखरा, कुरळी व उमरखेड येथील गहाळ झालेल्या संस्थेच्या मालमत्तेचा शोध घेण्यात यश आल्याचे रावते पाटील यांनी सांगितले. तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला संस्थेच्या लीजचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी सहकार्य केल्याचे त्यांनी नमूद केले.

गोरगरीब व कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी विविध उपक्रम राबविण्यासह साखरा येथे मंगल कार्यालय उभारण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

नितीन भुतडा यांनी संचालक मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन काम करावे, असे त्यांनी सांगितले. खरेदी-विक्री संघाला महाराष्ट्रातील आदर्श सहकारी संस्था बनविण्याचा मानसही व्यक्त केला. आमदार किसनराव वानखेडे यांनी मार्गदर्शन केले. सचिव विजय माने यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

आमसभेला माजी आमदार विजय खडसे, शिवाजी माने, कृष्ण पाटील देवसरकर, रमेश चव्हाण, श्रीपाल आडे, गणेश नरवाडे, राधेश्याम भट्टड, प्रकाश दुधेवार, प्रज्ञानंद खडसे, विजय हडपकर, गोपाल कलाने, प्रणिता कांबळे, विनायकराव कदम, महेश काळेश्वरकर यांच्यासह पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. संचालन तानाजी चंद्रवंशी यांनी केले. आभार गणेश नरवाडे यांनी मानले.

# आशियाई हॉकी विजेत्या तनुश्री कडूचा सत्कार



प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**आर्णी :** चीनमधील मोकी येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाने सुवर्णपदक पटकावले. या ऐतिहासिक कामगिरीत आर्णी तालुक्यातील सायखेडा लिंगी येथील तनुश्री दिनेश कडू हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत मोलाचे योगदान दिले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अखिल भारतीय कुणबी, मराठा, देशमुख समाजाच्या वतीने देऊरवाडी पुनर्वसन येथे तिचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनिष पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी गंगाधर होवाळे, तहसीलदार वैशाख वाहुरवाघ, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी किशोर रावते, संदिप बुटले, विलास राऊत व आबिद फानन उपस्थित होते. महेश बुटले यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी सायकलिंग क्लब, मराठा महासंघ, वकील संघ तसेच पत्रकारांच्या वतीने तनुश्रीचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी तिच्या कामगिरीचे कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन कुणाल मनवर यांनी केले. प्रमोद चौधरी यांनी आभार मानले. यावेळी मनोज चारोडे, प्रविण मंदुलवार, संदिप ढोले, सचिन शिंदे, प्रमोद पठाडे, सुनिल राणे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

### शिक्षकांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे सहकार्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली

- लहानपणापासूनच खेळाची आवड होती. पाचवीत असताना हॉकीची निवड केली. घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही जिद्द, मेहनत, सातत्याने सराव सुरू ठेवला. शिक्षकांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन, कुटुंबीयांचे सहकार्य यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता आले.

- तनुश्री कडू, आशियाई हॉकी विजेत्या

# गणेशोत्सव शांततेत, उत्साहात साजरा करा : कुमार चिंता

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

## बाबापूर येथील नवसाला पावणाऱ्या गणपती मंडळाला भेट : सुरक्षिततेचा घेतला आढावा

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यामध्ये गणेशोत्सव कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून शांततेत, उत्साहात व सामाजिक सलोखा जपत साजरा व्हावा, यासाठी जिल्हा पोलीस दलाकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी २३ सप्टेंबर रोजी वणी तालुक्यातील प्रसिद्ध श्री क्षेत्र बाबापूर येथील गणेश मंडळाला भेट देऊन गणेशोत्सवाच्या तयारीचा तसेच सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

श्री क्षेत्र बाबापूर येथील गणपतीची 'नवसाला पावणारा



गणपती' अशी मोठी आख्यायिका आहे. या ठिकाणी गणेशोत्सवादरम्यान दहा दिवस अत्यंत भक्तिभावाने व पारंपारिक पद्धतीने बाप्पाचा उत्सव साजरा केला जातो. यवतमाळ, वणी, चंद्रपूर जिल्हा तसेच शेजारच्या तेलंगणा राज्यातून दररोज १५ ते २० हजार भाविक बाप्पाच्या दर्शनासाठी येथे हजेरी लावतात. विशेष म्हणजे, सन १९३३ पासून बाबापूर येथे 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना अत्यंत यशस्वीरीत्या राबवली जात आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सपुत्नीक बाबापूर येथील गणेश मंडळाला भेट देऊन बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी मंडळाच्या वतीने पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांचा सपुत्नीक सत्कार करण्यात आला.

### ध्वनिक्षेपकाचे नियम पाळा, अफवांवर विश्वास ठेवू नका!

- 'गणेश मंडळांनी ध्वनिक्षेपकाचा (डीजे/साऊंड सिस्टीम) वापर निश्चित वेळेत व नियमानुसार करावा, जेणेकरून वाहतुकीस अथवा नागरिकांना अडथळा निर्माण होणार नाही. मंडप परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संशयास्पद बाबी आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी योग्य पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून सर्वांनी पोलिसांना सहकार्य करावे."

- कुमार चिंता, पोलीस अधीक्षक, यवतमाळ

या भेटीदरम्यान त्यांनी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.

गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ति, सामाजिक एकोपा वाढवणारा सण असून, सर्वांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून शांततेत व आनंदाच्या वातावरणात उत्सव साजरा करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# गणेशोत्सवात आरोग्यसेवेचा जागर

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

## भक्तिमय कार्यक्रमाचीही मेजवानी

नगर परिषद कर्मचारी गणेश मंडळाचा दोन दिवसीय उपक्रम

**उमरखेड :** नगर परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या नगर परिषद कर्मचारी गणेश मंडळातर्फे गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर, औषधवाटप तसेच भक्तिमय संगीत कार्यक्रमाचा समावेश आहे.

बुधवारी (ता. २३) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणात मोफत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी करण्यात येणार असून, गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप केले जाणार आहे.

शिबिरात डॉ. एस. पी. डोंगे, डॉ. अरुण बंग, डॉ. सोनाली बंग, डॉ. किशोर बाबुसिंग राठोड, डॉ. विवेक पत्रे, डॉ. शिवानंद कवाणे, डॉ. शेख मोहम्मद गौस, डॉ. जयराम बस्सी, डॉ. रेखा बस्सी, डॉ. अमेय अ. चक्करवार, डॉ. आशिष खांबाळकर व डॉ. श्याम दळवी यांच्यासह वैद्यकीय तज्ज्ञ नागरिकांची तपासणी करणार आहेत. दरम्यान, गुरुवारी (ता. २४) सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणात भक्तिमय व संगीत गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

मराठवाड्यातील भजन सम्राट जयपाल मठपती व शिव मठपती यांच्या भक्तिमय भजनाची मैफल रंगणार असून, सचिन पवार यांचा संचही कलाविष्कार सादर करणार आहे. दोन्ही कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी नगर परिषदेच्या अध्यक्षा तेजश्री संतोष जैन राहणार आहेत. उपाध्यक्ष, सर्व सभापती व नगर परिषद सदस्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या हस्ते होणार आहे. गणेश मंडळाचे अध्यक्ष कृष्णा लांबटिळे, उपाध्यक्ष अ. कय्युम अ. रज्जाक, राजेश महाजन, सचिव शिवाजी काळे, सहसचिव खंडू खरूसकर, कोषाध्यक्ष पवन पवार, सल्लागार भाग्यश्री कदम, गिरीश गारुडी, गजानन उत्तरवार यांच्यासह नगर परिषद अधिकारी व कर्मचारी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेत आहे.

# राजकीय पक्षांनी आचार संहितेचे काटेकोर पालन करावे - विभागीय आयुक्त नयना गुंडे

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक; राजकीय पक्षांच्या बैठकीत विभागीय आयुक्तांचे आवाहन

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती:** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. यादरम्यान, राजकीय पक्षांनी प्रचार सभा व रॅली घेताना आदर्श आचार संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी आज येथे केले.



अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात राजकीय पक्षांची बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

भारत निवडणूक आयोगाने अमरावतीसह राज्यातील चार विभागांतील महाराष्ट्र विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रम जाहीर झाल्यापासूनच विभागात आदर्श आचार संहिता लागू झाली असून त्यात विहित सूचना व नियमांचे राजकीय पक्षांनी काटेकोरपणे पालन करावे, विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये प्रचारसभा व रॅली घेण्याकरिता विभागीय आयुक्त कार्यालयात परवानगी मिळेल तसेच एकच प्रचार सभा असेल तर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयातून परवानगी देण्यात येईल,या कालावधीत वाहन वापरण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या नियमानुसार कार्यवाही व्हावी ,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या निवडणूक कालावधी दरम्यान विभागातील 5 जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. विभागातील 27 उपविभागीय अधिकारी सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्य करतील तर 56 तहसीलदार हे पदानिर्देशित अधिकारी म्हणून जबाबदारी पाहतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या 29 सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रचारसभा आयोजनासाठी शाळा व महाविद्यालय परिसर टाळावा, सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेवून सभा व रॅली आयोजन व्हावे, असेही त्यांनी सांगितले. निवडणूक कार्यक्रम तसेच आचार संहिता काळात 'काय करावे व काय करू नये!' आदींबाबत त्यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती दिली. सामान्य प्रशासन अपर आयुक्त संजय जाधव, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिवाजी शिंदे यावेळी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर युवक काँग्रेसने जाळला बावनकुळेंचा पुतळा !

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती:** लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुलजी गांधी यांच्यावर अमरावती जिल्ह्याचे निष्क्रिय पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन केलेल्या बेताल व प्रक्षोभक विधानाचा अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र शब्दांत धिक्कार करण्यात आला. आज संतप्त युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन केले आणि जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.



स्वतःच्या निष्क्रियतेवर पांघरूण घालण्यासाठी आणि वरिष्ठ नेत्यांची खुशामत करण्यासाठीच बावनकुळे यांनी राहुलजी गांधींवर बिनबुडाचे आरोप केले आहेत. अशा प्रकारे सातत्याने बेताल वक्तव्ये करणाऱ्या भाजप नेत्यांना आता मेंटल हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंट घेण्याची गरज निर्माण झाली आहे, असा घणाघाती टोला यावेळी आंदोलकांनी लगावला. येत्या काळात जनता आणि राहुलजी गांधी या भाजप नेत्यांना त्यांची खरी जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशारा यावेळी देण्यात आला.

सत्तेच्या नशेत मग्रूर झालेल्या भाजप नेत्यांनी मर्यादा ओलांडून राहुलजी गांधींसारख्या कणखर आणि जनमानसातील नेत्यावर चिखलफेक करण्याचे दुःसाहस करू नये; अन्यथा या बेताल विधानांची मोठी किंमत सत्ताधाऱ्यांना चुकवावी लागेल. राहुलजी गांधी हे देशातील कोट्यवधी तरुणांचा आणि शेतकऱ्यांचा बुलंद आवाज आहेत. त्यांच्यावर केलेली ही हीन टीका अमरावतीचा युवक काँग्रेस कधीही खपवून घेणार नाही. बावनकुळे यांनी आपले शब्द मागे घ्यावे अन्यथा आक्रमक पवित्रा युवक काँग्रेस घेईल, असा निर्वाणीचा इशारा कार्यकर्त्यांनी दिला. जिल्ह्यात शेतकरी अडचणीत असताना, सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम नसताना आणि मूलभूत सुविधांचा बट्ट्याबोळ उडालेला असताना पालकमंत्र्यांना जनतेच्या प्रश्नांचा पूर्ण विसर पडला आहे.

बावनकुळे यांनी काल झालेल्या बैठकीत स्वतः मान्य केले की अधिकारी यांच्यावर त्यांचे अंकुश नाही.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती विमानतळ येथे आगमन झाले. त्यानंतर नियोजित कार्यक्रमासाठी रवाना झाले. तत्पूर्वी त्यांचे विभागीय आयुक्त नयना गुंडे, विशेष पोलीस महानिरीक्षक महेश पाटील, अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महापालिका आयुक्त गोंदवले, आमदार रवी राणा, आमदार प्रवीण तायडे, आमदार राजेश वानखडे यांनी त्यांचे स्वागत केले.

# घर, ज्वेलर्सचे दुकान फोडणारी आंतरराज्यीय टोळी गुन्हे शाखेच्या ताब्यात

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती:** आंतरराज्यीय घरफोडी व ज्वेलर्स चे दुकान फोडणारी टोळी गुन्हे शाखेच्या ताब्यात घेतले असून ही कारवाई अमरावती गुन्हे शाखेने केली.



११/०९/२०२६ रोजी पो. स्टे पो.स्टे गाडगेनगर येथे अप.न. ९७८/२०२६ कलम ३०५ (अ), ३३१ (४) भा.न्या.सं. प्रमाणे ज्वेलर्सचे दुकान फोडुन सोने व चांदी चोरी केल्याबाबतचा गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना गुन्हे शाखा युनिट क. २ चे पथकास माहीती मिळाली की अशाच प्रकारचा गून्हा पोस्टे फ्रेजरपुरा व राजापेठ मध्ये सुध्दा घडला आहे. त्यामुळे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांनी युनिट क्रमांक दोनची दोन वेगवेगळी पथके तयार करून नमुद गुन्हयाचा तपास तसेच गुन्हयातील आरोपीतांना निष्पन्न करून त्यांना अटक करण्या कामी रवाना केले.

सदर गुन्हयामध्ये गुन्हे शाखेच्या पथकास असे निदर्शनास आले की, पोस्टे गाडगे नगर, फेजरपुरा व राजापेठ येथे गून्हा करणारे आरोपी हे एकच आहे ज्यांनी अमरावती शरातील एकुण ३ ज्वेलर्स चे दुकाण फोडले व एक मोटरसायकल चोरी केली आहे. गून्हे शाखेचे दोन्हीं पथक निरंतर गुन्हयातील आरोपीतांचा सि.सि. टी.व्ही. फुटेजच्या माध्यमातुन पाठलाग करीत होते. पथकाने २०० ते २५० कि. मी. अंतरा पर्यत जवळपास ३०० ते ३५० सि.सि.टी.व्ही. फुटेज चेक करित असतांना लक्षात आले की, आरोपी हे घरफोडी व ज्वेलर्सचे दुकान फोड्डन चोरी करणारे बुलढाणा जिल्हयातील रेकॉर्डवरिल सराईत गुन्हेगार आहेत. त्यांची गोपनिय बातमीदाराकडुन त्यांचे राहते ठिकाणांची माहीती घेवुन व गून्हा केल्यानतंर ते कोठे जावु शकतात याबाबत माहीती घेवुन त्यांचा बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, हिंगोली, अकोला तसेच सुरत राज्य गूजरात येथे शोध घेतला तसेच गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांचे राहते ठिकाणी गूप्त बातमीदार नेमुन त्यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्याकरिता सांगीतले होते.

दिनांक- २३/०९/२०२६ रोजी गूप्त बातीमीदाराकडुन माहीती मिळाली की गुन्हयातील आरोपी नामे गणेश मानवतकर हा त्याचे हिरो स्प्लेडंर गाडी क्रमांक एम.एच.२८ सि.जि.५७११ ने त्याचे दोन साथीदार व घरफोडी व दुकाण फोडण्याचे संपुर्ण साहीत्य तसेच चोरी केलेल्या मालासह अकोला येथुन नागपुर कडे येत आहेत. अशा गूप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीती वरून व तांत्रिक माहीतीव्दारे सदरच्या बातमीची शहानिशा करून सदरची माहीती वरिष्ठांना देवुन त्यांचे आदेशाने गुन्हे शाखेचे पथक हे राममेघे कॉलेज जवळील जंगला मध्ये दोन पथक थोळया-थोळया अंतरावर सापळा रचुन थांबले व काही वेळानी माहीती मिळालेल्या वर्णना प्रमाणे काळया रंगाच्या कॉलेज बॅग पाठीवर असलेल तिन इसम एका मोटर सायकलवर येत असतांना दिसुन आले. आरोपी यांना विश्वासात घेवुन अमरावती शहरातील गुन्हयाबाबत विचारणा केली असता त्यांनी अमरावती शहरा मध्ये खालील प्रमाणे गुन्हे केल्यायची कबुली दिली. ताब्यात घेतलेल्या आरोपीतांचे नाव रोशनसिंग बबलुसिंग टाक वय २४ वर्ष रा. संजय नगर, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा. हरिंदरसिंग संतोषसिंग दुधाणी, वय २४ वर्ष रा. सेंदला ता. मेहकर, जि. बुलढाणा. , गणेश जनार्धन मानवतकर, वय ३२ वर्ष रा. शेंदला, ता. मेहकर, जि. बुलढाणा असे आहेत.

# प्रलंबित ई-केवायसी तात्काळ पूर्ण करा : जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

## दहा दिवसांत 60 टक्के शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करावे

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत ई-केवायसीअभावी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांची तात्काळ ई-केवायसी करावी, तसेच कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना येत्या दहा दिवसात पीक कर्ज वाटप करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक सुनील पाण्डेय, स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक आशिष सिंह उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी कर्जमाफी योजनेंतर्गत प्रलंबित असलेली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित बँकर्स, तसेच सहकार विभागाला दिले. पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया प्रलंबित राहणार नाही, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून त्याचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही देण्यात आली.

# आ.रवि राणा यांच्या बडनेरा जुनीवस्ती परिसरातील गणेशोत्सव मंडळांना भेटी

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती :** आ.रवि राणा यांनी बडनेरा जुनीवस्ती परिसरातील विविध गणेशोत्सव मंडळांना भेटी दिल्या. गणरायाचे घेतले मनोभावे दर्शन घेतले. महाआरती करण्यात आली. यावेळी आकर्षक सजावट व देखावे साजरे करणाऱ्या गणेश मंडळाच्या सदस्याचे आ.रवि राणा यांनी केले कौतुक बडनेराचा राजा गणेश उत्सव मंडळ, सुविचार गणेशोत्सव मंडळ, लोकमान्य टिळक गणेश उत्सव मंडळ, न्यू प्रशांत गणेश उत्सव मंडळ, न्यू दोस्ती गणेश मंडळ, जयहिंद गणेश उत्सव मंडळ, ॐ गणेश उत्सव मंडळ, ॐ तांडव सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, चंद्रनगरचा राजा, शिवाजी गणेश उत्सव मंडळाचा, विद्यार्थी गणेशोत्सव मंडळ, नवचैतन्य गणेश मंडळाचा समावेश

## गणरायाचे घेतले मनोभावे दर्शन



अमरावती : गणेशोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त जुनीवस्तीबडनेरा परिसरातील विविध गणेशोत्सव मंडळांना आमदार रवि राणा यांनी भेटी देऊन गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंडळांच्या वतीने उभारण्यात आलेल्या आकर्षक सजावट, भव्य देखावे तसेच गणेशभक्तांसाठी करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करण्यात आली.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा उत्सव आहे. या भावनेतून जुनी वस्ती परिसरातील गणेशोत्सव मंडळांनी उत्साहात गणेशोत्सव साजरा केला आहे. मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमातून परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी बडनेराचा राजा गणेश उत्सव मंडळ, सुविचार गणेशोत्सव मंडळ, लोकमान्य टिळक गणेश उत्सव मंडळ, न्यू प्रशांत गणेश उत्सव मंडळ, न्यू दोस्ती गणेश मंडळ, जयहिंद गणेश उत्सव मंडळ, ॐ गणेश उत्सव मंडळ, ॐ तांडव सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, चंद्रनगरचा राजा, शिवाजी गणेश उत्सव मंडळाचा, विद्यार्थी गणेशोत्सव मंडळ, नवचैतन्य गणेश मंडळ इत्यादी गणेश मंडळांना भेट देण्यात आली. प्रत्येक मंडळाने आपल्या कल्पकतेनुसार केलेली आकर्षक सजावट आणि उभारलेले देखावे पाहून मंडळांच्या कार्यकर्त्यांचे आ.रवि राणा यांच्याकडुन कौतुक करण्यात आले.

# जिल्ह्यातील गड-किल्ले, संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती :** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील केंद्र व राज्य संरक्षित किल्ले तसेच राज्य संरक्षित स्मारकांचे जतन, संवर्धन आणि सुरक्षेसाठी जिल्हास्तरीय दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा सुस्थितीत राहावा, स्मारकांवर झालेली अनधिकृत अतिक्रमणे हटवली जावीत आणि भविष्यात नव्याने अतिक्रमणे होऊ नयेत, यासाठी ही समिती कार्यरत राहणार आहे. समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, तर सदस्य म्हणून पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगरपालिका आयुक्त मंगेश गोंदावले, उपवनसंरक्षक के. आर. अर्जुना, भूमी अभिलेख अधीक्षक महेश शिंदे, दर्यापूर नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणचे पुरातत्व विदु डॉ. अभिजित आंबेकर, राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, पुणेचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वहाणे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रादेशिक बंदर अधिकारी, प्रतीक पाथरे यांचा समावेश आहे.

# अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करा: जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## अमरावती शहर व ग्रामीण भागात 8 महिन्यांत 69 गुन्हे दाखल; 54 प्रकरणांत दोषारोपपत्र सादर

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अमरावती:** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत दाखल असलेल्या प्रकरणांवर संबंधित यंत्रणांनी समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी. पोलीस तपासावरील तसेच न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी दिले.



जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.या बैठकीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, 1989 व सुधारित नियम, 2016 अंतर्गत दाखल गुन्हे, पोलीस तपासावरील प्रलंबित प्रकरणे, न्यायालयीन खटले आणि अत्याचारग्रस्तांना देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. 1 जानेवारी ते 31 ऑगस्ट 2026 दरम्यान अमरावती शहर व ग्रामीण विभागात एकूण 69 गुन्हे दाखल झाले. यापैकी 54 प्रकरणांमध्ये पोलीस तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) सादर करण्यात आले आहे, तर 13 प्रकरणे अद्याप पोलीस तपासावर प्रलंबित आहेत. या प्रलंबित प्रकरणांमध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदवणे, आरोपींना अटक करणे तसेच जात प्रमाणपत्राशी संबंधित कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

सन 1995 पासून ते 31 ऑगस्ट 2026 पर्यंतच्या शहर व ग्रामीण विभागातील एकूण 2 हजार 377 प्रकरणांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. न्यायालयीन प्रकरणांचा जलद निपटारा व्हावा यासाठी पोलीस विभाग आणि शासकीय अभियोक्ता (सरकारी वकील) यांनी समन्वयाने काम करावे, तसेच आता दरमहा प्रकरणनिहाय आढावा बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले. 49 अत्याचारग्रस्तांना 'स्पर्श' प्रणालीद्वारे 2026-27 या आर्थिक वर्षात अत्याचारग्रस्तांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी शासनाकडून 80 लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यापैकी 49 प्रकरणांमध्ये 'SPARSH' (स्पर्श) प्रणालीद्वारे थेट आर्थिक सहाय्य वितरित करण्यात आले आहे. उर्वरित पात्र प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून निधी वितरणाची प्रक्रिया गतिमान करण्याचे आदेश देण्यात आले. नियुक्तीशासन निर्णय 20 नोव्हेंबर 2025 अन्वये, खून किंवा मृत्यू प्रकरणातील पात्र वारसांना शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्याच्या प्रकरणांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. पूर्वीच्या प्रकरणांमध्ये पात्र ठरलेल्या 21 वारसांपैकी 16 वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# मेळघाटातील महिला व बाल विकास विभागातील पोषण आहारावर प्रश्नचिन्ह

जयकिसन इंगळे २४ सप्टेंबर

**धारणी:** कुपोषणासाठी देशभरात चर्चेत राहिलेल्या मेळघाटातील सुधारणा झाली असली, तरी कुपोषणाची परिस्थितीत कालांतराने काही प्रमाणात समस्या अद्याप पूर्णपणे संपलेली नाही. चिखलदरा तालुक्यात ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील १४ हजार ६०७बालकांना २२९ अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून नियमित पोषण आहार दिला जात आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, यापैकी ५० बालके अति कुपोषित, तर ८०० बालके मध्यम कुपोषित श्रेणीत आहेत.पावसाळयात कुपोषणाच्या प्रकरणांवर विशेष लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. चिखलदरा तालुक्यातील १४३ गावांमध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत २२९ अंगणवाडी



केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांमध्ये बालकांना दररोज लापशी, खिचडीसह विविध प्रकारचा पोषण आहार दिला जातो. बालकांचे वजन व उंची यांच्या आधारे त्यांच्या पोषणस्थितीचे ग्रेडेशन केले जाते. त्यानुसार बालकांना अति कुपोषित, मध्यम कुपोषित आणि सामान्य अशा श्रेणींमध्ये वर्गीकृत केले जाते. कुपोषित बालकांना अतिरिक्त पोषण आहार तसेच आवश्यक देखभाल उपलब्ध करून त्यांना सामान्य श्रेणीत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुर्गम गावांमध्ये देखरेख हे मोठे आव्हानः चिखलदरा तालुक्यातील दुर्गम भागात कुपोषणाची स्थिती आव्हानात्मक आहे. गावातील काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या मते एक्सपायरी झालेला आहार बंद पाकीट मध्ये येतो व त्यामुळे बालकांना नुकसान होऊ शकते याकडे कुणाचे लक्ष नसते. दोन्ही तालुक्याच्या विस्तार अधिकारी सुपरवाइसर, व बाल विकास अधिकारी यांनी माता पालक बैठका घेऊन लक्ष केंद्रित करण्याची गरज दिसत आहे.२२९ अंगणवाडी केंद्रांच्या देखरेखीसाठी केवळ नऊ महिला पर्यवेक्षक कार्यरत आहेत. प्रत्येकाकडे सुमारे २५ केंद्रांची जबाबदारी आहे. तालुक्याचा मोठा भौगोलिक विस्तार, जंगल, खराब रस्ते व अपुऱ्या वाहतूक सुविधांमुळे दुर्गम गावांमधील अनेक अंगणवाडी केंद्रांच्या इमारतींची अवस्था आणि उपलब्ध सुविधाही चिंतेचा विषय आहेत. लहान खोल्यांमध्ये बालकांना बसविण्यासोबतच भोजन तयार करणे व अन्य उपक्रम राबविण्याची वेळ येते. काही ठिकाणी केंद्रांपर्यंत जाण्यासाठी पक्के रस्ते तसेच पुरेशा वाहतूक सुविधा नसल्याने अंगणवाडी सेविकांनाही अडचणींचा सामना करावा लागतो.सर्व केंद्रांपर्यंत नियमित पोहोचणे, पाहणी व पोषण व्यवस्थेचा आढावा घेणे कठीण होत आहे. या करिता रिक्त पदे भरण्याची गरज दिसत आहे व पदभरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी अशी मागणी मेळघाटवासी करत आहे त्यामुळे चिखलदरा तालुक्यात चूर्णी, मोथा, गोलखेड़ा, खटकाली, सेमाडोह, सलोना, टेंबुरसोंडा, जरीदा आणि हतरु यांसारख्या दुर्गम भागांमध्ये अंगणवाडी सेवांची नियमित देखरेख करणे हे विशेष आव्हान ठरत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि. २४ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## बोगस शिक्षक भरती प्रकरणात एसआयटी आक्रमक...

# शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव, गायब झाले की केले, मात्र मुख्याध्यापकाचे येले, चूक कोणाची अन कोण मेले !





### * वाशीम जिल्ह्यातील २९१ शिक्षकांचे मान्यता प्रस्ताव गायब; शिक्षण क्षेत्रात खळबळ
### * गहाळ प्रस्ताव शाळांनी उपलब्ध करून देण्याच्या सूचनेसह प्रतिज्ञापत्राची मागणी
### * गोपनीयतेऐवजी सोशल मीडियावर माहिती प्रसारित केल्याने एसआयटी चौकशीवर प्रश्नचिन्ह

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधित २९१ शिक्षकांचे मान्यता प्रस्ताव एसआयटीकडे उपलब्ध नसल्याच्या पार्श्वभूमीवर 'ते' मान्यता प्रस्ताव संबंधित शाळांनी उपलब्ध करून द्यावेत, तसेच संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांकडून नियुक्त्या नियमाप्रमाणे झाल्याचे नमूद करणारे प्रतिज्ञापत्र घेण्याच्या कार्यवाहीमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाल्याची चर्चा आहे.**

राज्यात बोगस शिक्षक भरती आणि बनावट शालार्थ आयडीचा घोटाळा उघडकीस आल्याने सध्या शिक्षकांच्या नियुक्त्या व मान्यता प्रक्रियेबाबत एसआयटीची चौकशी सुरू झाल्याने 'या ' प्रकरणाकडे अधिक गांभीर्याने पाहिले जात आहे. संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या नियुक्त्या नियमाप्रमाणे झाल्या असल्याचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करावे आणि दिलेली माहिती चुकीची आढळल्यास त्याची जबाबदारी स्वीकारावी, अशा स्वरूपाची हमी मागविण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. 'ते ' १९१ मान्यता प्रस्ताव माध्यमिक शिक्षण विभागाकडे उपलब्ध असावयास पाहीजे या प्रकरणातील महत्त्वाचा प्रश्न असा उपस्थित होत आहे की, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या व मान्यतेशी संबंधित प्रस्तावांवर निर्णय घेणाऱ्या संबंधित शिक्षण विभागाच्या कार्यालयात ते सर्व प्रस्ताव उपलब्ध असणे अपेक्षित असताना त्या उपलब्ध नसल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही प्रथम कार्यालयीन पातळीवर होणे आवश्यक असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केल्या जात आहे. माध्यमिक शिक्षण विभागात ते मान्यता प्रस्ताव उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून कार्यालयीन पातळीवर चौकशी करून, त्यानंतर संबंधित शाळांना स्वतंत्र पत्राद्वारे कागदपत्रे मागविणे हा अधिक औपचारिक मार्ग असू शकला असता, असे मत काही जाणकार मंडळीने व्यक्त केले आहे.

**सोशल मीडियावर नावे प्रसिद्ध झाल्याने निर्दोषांनाही मनस्ताप?**



या प्रकरणातील आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे संबंधित यादी सोशल मीडियावर प्रसारित झाल्यामुळे त्यामध्ये असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे सार्वजनिक झाली आहेत. यादीतील प्रत्येक व्यक्ती दोषी आहे, असा निष्कर्ष केवळ नाव प्रसिद्ध झाल्यामुळे काढता येत नाही. नियुक्ती प्रक्रियेत सर्व नियमांचे पालन केलेल्या शिक्षकांची नावेही त्यात असण्याची शक्यता असल्याने चौकशी पूर्ण होण्यापूर्वी संबंधित व्यक्तींची सामाजिक प्रतिमा मलिन झाल्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

यादी सोशल मीडियावर आल्यानंतर काही शिक्षकांना नातेवाईक, परिचित व इतरांकडून फोन करून विचारणा केली जात आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांसह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अनावश्यक मानसिक तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे.

**गोपनीय चौकशीऐवजी सार्वजनिक यादी का?**

शिक्षण क्षेत्रातील काही जाणकारांच्या मते, जर मान्यता प्रस्तावाची आवश्यकता चौकशीसाठी असेल तर संबंधित मुख्याध्यापक अथवा संस्थेला अधिकृत पत्राद्वारे आणि आवश्यक गोपनीयता राखून कागदपत्रे मागविता आली असती. सोशल मीडियावरून यादी सार्वजनिक करण्याची आवश्यकता का निर्माण झाली, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.दरम्यान, काही जाणकारांनी व्यक्त केलेल्या मतानुसार, या संपूर्ण प्रक्रियेचा नेमका उद्देश काय आहे, प्रतिज्ञापत्रामागील प्रशासनाची भूमिका काय आहे आणि पुढील कार्यवाही कोणत्या पद्धतीने होणार आहे, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. मात्र, या संदर्भातील आरोप अथवा शक्यता अधिकृत चौकशीअंतीच स्पष्ट होतील, हेही महत्त्वाचे आहे.

**एसआयटी चौकशीबाबतही प्रश्न**

एसआयटी चौकशी सुरू असताना संबंधित मान्यता प्रस्तावा पैकी काही प्रस्ताव उपलब्ध नसल्याचे समोर येत असेल तर त्या चौकशीदरम्यान आतापर्यंत किती प्रस्ताव तपासण्यात आलेत, किती प्रस्ताव उपलब्ध आहेत आणि किती प्रस्ताव उपलब्ध नाहीत, याची स्पष्ट माहिती सार्वजनिक प्रशासनिक नोंदीतून समोर येणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

तसेच, फाईल्स उपलब्ध नसण्याचे कारण काय, त्या कोणत्या स्तरावर उपलब्ध नाहीत आणि त्यासाठी जबाबदारी कोणाची निश्चित करण्यात आली आहे, याबाबतही पारदर्शकता आवश्यक असल्याची मागणी जाणकारांनी केली आहे.

**मुख्याध्यापकांच्या नियुक्त्यांची नावेही यादीत?**

काही जाणकारांच्या चर्चेनुसार, यादीमध्ये काही मुख्याध्यापकांच्या नियुक्त्यांशी संबंधित नावेही आढळल्याचे सांगितले जात आहे. मात्र, एखाद्या मुख्याध्यापकाचे नाव यादीत असणे म्हणजे त्यांची नियुक्ती अनियमित आहे, असा निष्कर्ष काढता येणार नाही.कारण अनेक मुख्याध्यापकांची नियुक्ती दीर्घ शैक्षणिक सेवेनंतर झाली असल्याने त्यांच्या नियुक्ती प्रक्रियेचा स्वतंत्र संदर्भ तपासणे आवश्यक आहे. त्यामुळे यादीतील नाव, नियुक्तीची वैधता आणि प्रत्यक्ष अनियमितता या तीन वेगवेगळ्या बाबी असून त्यांची स्वतंत्रपणे पडताळणी होणे गरजेचे आहे.

**चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा**

या संपूर्ण प्रकरणामुळे वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण क्षेत्रात मोठी चर्चा सुरू झाली आहे. संबंधित शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी अथवा मुख्याध्यापक दोषी आहेत किंवा नाहीत, याचा अंतिम निर्णय अधिकृत कागदपत्रे, नियुक्ती प्रक्रिया, शासन नियम आणि चौकशीच्या निष्कर्षांच्या आधारेच होणे अपेक्षित आहे.फाईल्स उपलब्ध नसतील तर त्या उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही व्हावी; मात्र त्याचवेळी दोष सिद्ध होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीची सामाजिक बदनामी होणार नाही, चौकशीची गोपनीयता राखली जाईल आणि संबंधितांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळेल, अशी अपेक्षा शैक्षणिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे. दरम्यान, वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील २९१ प्रस्तावांपैकी नेमक्या किती फाईल्स उपलब्ध नाहीत, त्या कोणत्या कालावधीतील आहेत, त्यांची जबाबदारी कोणत्या स्तरावर आहे आणि प्रतिज्ञापत्राची आवश्यकता कोणत्या अधिकृत आदेशानुसार निर्माण झाली आहे, याबाबत संबंधित शिक्षण विभागाकडून अधिकृत स्पष्टीकरण मिळणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---

## थोडक्यात

### निष्पक्ष चौकशीसाठी तहसीलदारांचा पदभार काढा!

**तेजनकर यांना रिसोडमधून हटविण्याची शिवसेना ठाकरे गटाची मागणी**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांची विभागीय चौकशी नेमण्यात आली असताना त्यांना तहसीलदार पदावर



कायम ठेवणे कितपत योग्य, असा संतप्त सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उपस्थित केला आहे. विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांच्याकडील तहसीलदार पदाचा पदभार तातडीने काढून घ्यावा, अशी मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

तहसीलदारांविरोधात करण्यात आलेल्या तक्रारी व आरोपांची चौकशी निष्पक्ष, पारदर्शक आणि कोणत्याही प्रशासकीय प्रभावापासून मुक्त वातावरणात होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी त्याच पदावर कार्यरत असताना चौकशी झाल्यास तिच्या निष्पक्षतेबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना पदभारापासून दूर ठेवून अन्यत्र नियुक्त करावे, अशी मागणी पक्षाने केली आहे. 'विभागीय चौकशी सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांकडे त्याच पदाचा पदभार कायम ठेवणे योग्य नाही. निष्पक्ष चौकशी हवी असेल तर पदभार काढणे आवश्यक आहे. प्रशासनाने जनतेच्या विश्वासाचा विचार करून तातडीने निर्णय घ्यावा,' अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुकाप्रमुख घनश्याम मापारी यांनी केली. तसेच, 'प्रशासनाच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांना रिसोड तालुक्यात ठेवू नये. चौकशी पूर्ण होईपर्यंत पदभार काढून निष्पक्ष चौकशीचा मार्ग मोकळा करावा,' अशी भूमिका मापारी यांनी व्यक्त केली.

---

# आ. अंबादास दानवे यांनी केली दुष्काळग्रस्त भागाची पाहणी !

*** कृषी मंत्री धरणीला भार - आ .अंबादास दानवे.**
*** शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत करा.**
*** रिल्स बनवणाऱ्या तहसीलदारावर केली टीका.**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा आ. अंबादास दानवे यांनी मालेगाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. पावसाअभावी शेतकऱ्यांची जळालेले पिके, पडलेला कोरडा दुष्काळ याची पाहणी करून मालेगाव तालुक्यातील डही, एकांबा येथील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.दरम्यान सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी दानवे यांनी केली.

दि.२३ सप्टेंबर बुधवार रोजी शिवसेना उबाठाचे विधान परिषद आमदार अंबादास दानवे वाशिम जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणीसाठी दौऱ्यावर आले होते.दानवे यांनी मालेगाव तालुक्यातील डही आणि एकांबा परिसरातील पावसाअभावी नुकसान झालेल्या भागाची पिक पाहणी केली.शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक नष्ट झाले असून सरकारने तातडीने शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत जाहीर करावी अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान राज्याचे कृषिमंत्री काही दिवसाआधी नुकसानीची पाहणी करून गेले मात्र ठोस निर्णय झाला नाही. असे प्रश्न माध्यमांनी विचारले असता, कृषिमंत्री म्हणजे धरणीला भार आहेत. कारण काजू आणि बदाम खात त्यांच्या बैठका होतात. त्यांना जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटली पाहिजे.अशी बोचरी टीका अंबादास दानवे यांनी केली आहे.पुढे ते म्हणाले मुख्यमंत्र्यांना बॅरेकेट लावून यावं लागतं याचा अर्थ जनतेच्या भावना किती संतप्त आहेत हे बघण्याची आवश्यकता आहे .त्यामुळे सरकाने तातडीने शेतकऱ्यांना मदत जाहीर केली पाहिजे अशी अशी प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली.

तसेच वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांची विदारक परिस्थिती असताना रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर रील बनवत आहे ,असे प्रश्न केले असता,अशा पद्धतीने कोणी मगरुरीने वागत असतील तर मी शिवसैनिकांना सांगेल अशा अधिकाऱ्यांना जोड्याने मारलं पाहिजे.

अशी संतप्त प्रतिक्रिया आमदार अंबादास दानवे यांनी दिली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, उपजिल्हाप्रमुख अशोक अंभोरे, तालुकाप्रमुख उद्धव गोडे, तसेच जिल्ह्यातील व तालुक्यातील उबाठाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

---

## सेवा संकल्प अभियान अंतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

ग्रामपंचायत किन्ही रोकडे येथे दि. २१/९/२०२६ रोजी मुख्यमंत्री संवृद्ध पंचायतराज अभियान सण २०२६-२७ सेवा संकल्प अभियान अंतर्गत गावात आरोग्य शिबीर घेण्यात आले.यामध्ये डॉ.पंकज काटोले अस्थीरोग तज्ञ् गजानन हॉस्पिटल कारंजा लाड व त्यांचा चमू यांनी विनामूल्य सेवा दिली असून गावातील बहुसंख्य महिला पुरुष मंडळींनी लाभ घेतला आहे.यावेळी सरपंच मीनाताई मनोज रोकडे,उप सरपंच अमीर खान,ग्रा.पं.सदस्य आणी माजी सरपंच अरुण रोकडे,पंडित रोकडे, उपस्थित होते.अमोल रोकडे,प्रमोद रोकडे,गजानन काळे, कैलासभाऊ गिरी,डीगांबर जाधव,वसंत मामा कवळे यांनी डॉ.पंकज काटोले व त्यांच्या सहकार्याचे विशेष आभार मानले.या कार्यक्रमा करीता शिवशंभु गणेशउत्सव मित्र मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

## कारंजा येथील खून प्रकरणातील आरोपी गजाआड !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●



कारंजा येथील ब्राह्मणखेड शिवारात अमोल सुभाष रुईवाले यांच्या शेतात झालेल्या खून प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे दि.२१/९/२६ रोजी फिर्यादी, संतोष काशिराम तिडके,वय ४० वर्षे,व्यवसाय शेती,रा. माळीपुरा, कारंजा जि.वाशिम यांनी जबानी रिपोर्ट दिला की त्यांनी अमोल सुभाष रूईवाले यांचे ब्राहमणखेड शिवारातील ४० एकर शेती मक्ताने केली आहे.सदर शेती मध्ये कामाकरिता दिनेश रामू उईके रा.राजापुर ढाणा ता. मुलताई जि.बैतुल मध्य प्रदेश हा व त्याचे सोबत त्याचे वयाचा इसम हा कामा करिता असुन असे दोन व्यक्ती शेता मध्येच राहतात व काम करतात व तेथेच राहतात.दिनांक २१.०९. २०२६ रोजी फि. सकाळी ०८.०० वाजता शेतात चक्कर मारण्याकरिता गेले असता दिनेश उईके व त्याचे सोबत असलेला दुसरा कामगार दिसला नाही. वरुन फिर्यादी यांनी दिनेश याचे मोबाईल वर फोन केला असता दिनेश ने फिर्यादी यांना सांगीतले की,आम्हा दोघांत रात्री भांडण झाले त्याने मला चार, चापटा मारल्या, तर मी त्याला लहान सब्बल त्याचे डोक्यावर मारले त्यामुळे तो मरन पावला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान मृतकंची ओळख पटविण्यात आली असुन मृतकचे नाव युवराज धुराडी वरखडे वय ४० वर्षे, रा. छिंदवाडा, ता. मुलताई जि. बैतुल मध्य प्रदेश असे आहे.सदर गुन्हयातील आरोपी नामे दिनेश रामू उईके वय २९ वर्षे रा. रजापुर रयत, तहसिल मुलतई जि.बैतुल हा घटनास्थळावरुन गुन्हा केल्यानंतर फरार झाला होता.त्याचा अत्यंत कसोशीने शोध घेवुन त्यास मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेवुन सदर गुह्यात अटक करण्यात आली आहे.

---

# आ. अमित झनक शेतकऱ्यांच्या बांधावर !

### *मुंगळा-मेडशी शिवारातील नुकसानीची पाहणी *शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनाकडे पाठपुराव्याचे आश्वासन

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●





४०-४५ दिवसांपासून पावसाची दडी; शेतकरी संकटात

मागील ४० ते ४५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने मुंगळा-मेडशी परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीची 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने २१ सप्टेंबर रोजी वृत्ताच्या माध्यमातून दखल घेत लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले होते. या वृत्तात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करावी, शासनाकडे पाठपुरावा करून मदत मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

या वृत्ताची दखल घेत रिसोड-मालेगाव मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी मुंगळा आणि मेडशी शिवारात प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. पावसाने पाठ फिरवल्याने मुंगळा आणि मेडशी परिसरातील अनेक शेतांमध्ये सोयाबीन पीक करपून गेले आहे. संत्रा फळबागांनाही पावसाच्या खंडाचा फटका बसला असून तूर पिकाचेही नुकसान झाले आहे. पेरणीपासून लेकरासारखे जपलेले पीक हातातोंडाशी आले असताना पावसाअभावी शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली. शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीची माहिती देत शासनाकडून मदत मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी शेतकऱ्यांची व्यथा आणि शेतातील प्रत्यक्ष परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देऊन योग्य मदतीसाठी ठोस पाठपुरावा करण्याचा विश्वास लोकप्रतिनिधींनी दिला.

मुंगळा, मेडशीसह परिसरातील शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर आणि संत्रा पिकांच्या नुकसानीबाबत माहिती दिली. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे झालेल्या नुकसानीचा तातडीने पंचनामा करून शासनाने मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली. यावेळी रेगाव, खिर्डी, मुंगळा, मेडशी, कोळदरा, काळाकामठा, वाकळवाडी, पिंपळदरा, उमरवाडी आणि भौरद येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, २१ सप्टेंबर रोजी 'सिटी न्यूज सुपरफास्ट'मध्ये '४०-४५ दिवसांपासून पावसाची दडी; शेतकरी संकटात!' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते.

या वृत्तातून लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करावी, शासनाकडे पाठपुरावा करावा आणि शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. तसेच मागणीची दखल न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा दत्ता भांदुर्गे यांनी दिला होता. आता या वृत्तानंतर लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केल्याने शेतकऱ्यांच्या नुकसानीचा प्रश्न पुढे आला आहे. आता शासनाकडून प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधी किती प्रभावी पाठपुरावा करतात, याकडे मुंगळा-मेडशी परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

# वाशीम जिल्ह्यावर कोरड्या दुष्काळाचे सावट !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●



पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने वाशिम जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. पावसाअभावी सोयाबीन, तूर, हळद यासह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक ठिकाणी सोयाबीनची पिके करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असून जिल्ह्यावर कोरड्या दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शिवसंग्रामच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष तथा रिसोड-मालेगाव विधानसभा अध्यक्ष धनंजय पाटील बाजड यांनी याबाबत रिसोड व मालेगाव तहसीलदार तसेच वाशिम जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन देत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले. वाशिम, रिसोड आणि मालेगाव तालुक्यांमध्ये पावसाअभावी पिकांची परिस्थिती गंभीर झाली असून शेतकऱ्यांना तातडीने मदतीची गरज आहे. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे करून शासनाने त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि वाशिम जिल्ह्यात दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, अशी मागणी धनंजय पाटील बाजड यांनी केली आहे.

# कोलोरी येथे शेतकऱ्यांच्या बांधावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली नुकसानाची पाहणी

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**खामगाव :** पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिकांची झालेली वाताहत आणि हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याची व्यथा शेतकऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. शेतात एकही दाणा शिल्लक नाही, त्यामुळे कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी आर्त मागणी शेतकऱ्यांनी केली. यावर शिंदे यांनी शेतकऱ्यांची मागणी योग्य आहे. खामगाव तालुक्यात शंभर टक्के नुकसान झाले आहे.

मोठी मदत मिळेल,' अशी ग्वाही दिली. येत्या एक-दोन दिवसांत मदतीबाबत निर्णय होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. बुलढाणा दौऱ्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बुधवारी (२३ सप्टेंबर) खामगाव तालुक्यातील कोलोरी शिवारातील एका शेतात पिकांच्या नुकसानाची पाहणी केली. यावेळी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री संजय राठोड, आ. संजय गायकवाड, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे स्पष्ट केले. केंद्रानेही वेळोवेळी मदत केली असून, पुढेही केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांना पूर्ण मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, पीकाचे नुकसान याविषयी माहिती घेतली. यावेळी शेतकऱ्यांनी सोयाबीनसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. काही शेतांमध्ये १०० टक्के नुकसान झाले असून, शेंगांमध्ये दाणे भरले नसल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली. यावेळी शिंदेसेना जिल्हाप्रमुख अमोल अंधारे, संजय अवताडे, तालुकाप्रमुख राजेंद्र बघे आदींसह नेते, पदाधिकारी उपस्थित होते.



# खामगांव येथील आक्रोश मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- आ.सिद्धार्थ खरात



प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**मलकापुर :** कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत तातडीने द्या या इतर मागण्यांसाठी खामगाव येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा संदर्भात मलकापूर विधानसभा मतदारसंघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर व मेहकर मतदार संघाचे शिवसेनेचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.दि.३० सप्टेंबर बुधवार ला अप्पर जिल्हाधिकारी खामगाव कार्यालयावर बुलढाणा जिल्हा दुष्काळ ग्रस्त जाहीर करा व शेतकऱ्यांच्या ईतर सर्व मागण्यांसाठी शिवसेना उपनेते आमदार नितीन बापू देशमुख, जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्या नेतृत्वात आक्रोश मोर्चा चे आयोजन केले आहे. त्या निमित्ताने मलकापूर विधानसभा मतदारसंघ तील प्रमुख पदाधिकारी यांची बैठक शिवसेना सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने यांच्या संपर्क कार्यालयात दि.२३ सप्टेंबर २६ रोजी सायंकाळी ५ वाजता बैठक घेऊन मार्गदर्शन केले व मोर्चात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी व शिवसैनिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.यावेळी जिल्हा सहसंपर्क प्रमुख वसंतराव भोजने, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, दिपक चांभारे तालुका प्रमुख मलकापूर, हरिदास गणबास शहर प्रमुख मलकापूर, ईश्वर पांडव नांदुरा तालुका प्रमुख, विष्णू धोरण ऊप तालुका प्रमुख, अल्पसंख्याक सेना उपजिल्हाप्रमुख सै.वसिम सै.रहीम, यावेळी बाळु ठाकरे यांनी शिवसेना उध्दवजी बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश घेतला आ.सिद्धार्थ खरात यांनी भगवा दुप्पटा घालून त्यांचा सत्कार केला.

## मलकापुरात महिलेचे 40 हजारांचे मंगळसूत्र लांबवले; श्रद्धा नगरातील घटना

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**मलकापूर :** शहरातील श्रध्दा नगर, घिर्णी रोड परिसरात रात्रीच्या वेळी शतपावली करणाऱ्या एका ४५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी बळजबरीने हिसकावून पळ काढल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी रात्री८.४० वा. दरम्यान घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रध्दा नगर येथील रहिवासी सौ.वर्षा मंगेश सोनकुवर (वय ४५) या २१ सप्टेंबर रोजी रात्री संस्कृती सोनकुवर यांच्यासोबत आपल्या घरासमोर पायी शतपावली करत होत्या. याच दरम्यान २० ते २५ वयोगटातील दोन अज्ञात भामटे दुचाकीवरून त्यांच्या मागून आले.

अंगात निळ्या रंगाचे टी-शर्ट, काळसर रंगाची पॅन्ट आणि डोक्यावर पांढऱ्या रंगाची टोपी घातलेल्या या भामट्यांनी महिले जवळ दुचाकीचा वेग कमी केला. काही समजण्याच्या आतच त्यांनी सौ. सोनकुवर यांच्या गळ्यातील ९ ग्रॅम वजनाचे, अंदाजे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे छोटे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावून तोडले आणि दुचाकीवरून पोबारा केला.

घटनेनंतर पीडित महिलेने

# दामिनी पथकाची गोविंद विष्णू महाजन कॉलेजमध्ये भेट

प्रतिनिधी २४ सप्टेंबर



**मलकापूर :** येथील गोविंद विष्णू महाजन कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस विभागाच्या दामिनी पथकाने भेट देऊन विद्यार्थिनींमध्ये महिला सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण केली. यावेळी पो.कॉ.अर्चना मते यांनी विद्यार्थीनींशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, समस्या जाणून घेतल्या. तसेच कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास तो निःसंकोचपणे बोलण्याचे आवाहन केले. अशा प्रकारात तक्रारदार महिलेचे नाव गुप्त ठेवले जात असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

तसेच शाळा-महाविद्यालयाबाहेरील टवाळखोरांचा त्रास, पोलीस मदत कक्ष आणि दामिनी पथकाच्या टोल-फ्री क्रमांकाबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माछरे, ठाणेदार गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सुरक्षेसाठी पोलीस विभागाच्या दामिनी पथकाच्या माध्यमातून शहरातील विविध शाळा महाविद्यालया मध्ये राबविल्या जात असलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थीनींमध्ये सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होऊन पुढील शिक्षणासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढलेला दिसून येत आहे. त्यामुळे महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारचे जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असल्याचे मत प्रा डॉ नितीन भुजबळ यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह प्रा. डॉ. नितीन भुजबळ, प्रा. सुधाकर इंगळे, प्रा. राजश्री बोंबटकार यांची उपस्थिती होती.

**विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी जनजागृती व विविध विषयांवर केले मार्गदर्शन**

## गाडेगाव मोहल्ला येथे गणपती आरतीदरम्यान ताट फेकून दिल्यामुळे तणाव; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**मलकापूर :** येथील गाडेगाव मोहल्ला, मंगलगेट परिसरातील प्रतापगणेश मंडळात २२ सप्टेंबर रोजी रात्री गणपतीची आरती सुरू असताना एका इसमाने त्याच्या तीन अज्ञात साथीदारांसह येऊन हुज्जत घातली. त्यांनी धार्मिक भावना दुखावणारी विधाने करत आरतीचे ताट फेकून दिले. या प्रकारामुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला असून, परिसरात काही काळ पळापळी होऊन तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी विक्रमसिंह चतरसिंह राठोड रा.गाडेगाव मोहल्ला मलकापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलिसांनी साजीद अहमेद खान रा. बारादरी, मलकापूर व त्याच्या तीन अज्ञात साथीदारांविरुध्द भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९ व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. खबरदारीचा उपाय म्हणून मलकापूर टाऊन परिसरात फिक्स पॉईंट बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, सध्या शहरात पूर्णपणे शांतता आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत झेंडगे करत आहेत.

## छात्रसेवाकाळातून प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव !

### चोपडा महाविद्यालयातील शिबिराचा समारोप

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**खामगाव :** मातोश्री सायरबाई चंपालाल चोपडा बी.एड. महाविद्यालया च्या द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी आयोजित छात्रसेवाकाळ शिबिराचा समारोप सोमवारी झाला. खामगाव शहरातील अ. खि. नॅशनल हायस्कूल, सरलाबाई वरणगांवकर विद्यालय, विद्यालय आणि टिळक राष्ट्रीय विद्यालय येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र सुमारे सहा आठवड्यांच्या कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांनी इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना विविध अध्यापन पद्धतींचा वापर करून अध्यापन केले.

त्याचबरोबर स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आदर्श परिपाठ, निबंध, वक्तृत्व व राखी निर्मिती स्पर्धा तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनही विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समारोपप्रसंगी विविध स्पर्धातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. प्राचार्य डॉ. गजानन शर्मा, डॉ. अंजली शहाणे व छात्रसेवाकाळ प्रभारी प्रा. निंबाजी मेढे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे नियोजन झाले. गट मार्गदर्शक प्रा. वृशाली जोशी व प्रा. अनिल ढगे यांनी जबाबदारी पार पाडली.

## सुटाळा बु. शिवारातील जुगार अड्ड्यावर छापा; 17 जणांवर गुन्हा दाखल; पोलिसांकडून मुद्देमाल जप्त

### रोकड, दुचाकी, मोबाइलसह १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**खामगाव :** सुटाळा बु. येथील एका शेतात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर शिवाजीनगर पोलिसांनी मंगळवारी मध्यरात्री छापा टाकला. या कारवाईत १७ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रकमेसह ९ दुचाकी, १४ मोबाइल व जुगाराचे साहित्य असा एकूण १० लाख ३० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता सुटाळा बु, येथील श्रीकांत वानखडे यांच्या शेतात काही जण 'एक्का बादशहा' नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस अंमलदार संदीप टाकसाळ यांच्या नेतृत्वाखाली पथकाने दोन पंचांसह छापा टाकला. कारवाई पहाटे २३ सप्टेंबर रोजी ३:२० वाजता पूर्ण करण्यात आली. यावेळी श्रीकांत जगन्नाथ वानखडे (४०), अजय रामेश्वर लाहुडकर (२९), स्वप्नील भिकुलाल गांधी (४०), मनोज मनोहर उकर्डे (३८), शेख अलीम शेख कलीम (४२), मंगेश विनायक देशमुख (४२), दिनेश रमेश हेलोडे (४२), प्रवीण अशोक पायघन (२४), शिरीष लक्ष्मणराव डाबेराव (६१), रामसींग विलास पवार (३५), शेख करीम शेख रहीम (५४), रामु नरसिंगराव करनम (४२), शेख अनीस शेख अमजद (४५), महादेव रामदास चौके (२६), गोविंद अरविंद पुरवार (३८), महादेव देविदास राऊत (२२) आणि सुशील सुरेश राठोड (२६) यांच्यावर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी १ लाख ५ हजार रुपये रोख, ९ दुचाकी किंमत ७ लाख ४० हजार रुपये, १४ मोबाइल किंमत १ लाख ८४ हजार रुपये, दोन बॉक्स ५२ ताशपत्ते, बल्ब, पाण्याची कॅन, स्टीलचा डबा व दोन गाद्या असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिस अंमलदार संदीप टाकसाळ यांच्या फिर्यादीवरून कलम ४ व ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अमित तळोले करीत आहेत.

# प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण न केल्यास आंदोलन !

### कर्मचारी संघटनेचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**खामगाव :** थकीत वेतन, सेवा निवृत्तीचे लाभ, भविष्य निर्वाह निधी तसेच वैद्यकीय खर्चाची बिले प्रलंबित असल्याने नगर परिषद कर्मचारी संघटनेने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या तातडीने मार्गी न लावल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांना बुधवारी निवेदनाद्वारे नगर परिषद कर्मचारी रात्रंदिवस काम करून शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ता दिवाबत्ती यासह विविध नागरी सेवा पुरवितात. मात्र, वेतन आणि निवृत्तीविषयक आर्थिक लाभांमध्ये वारंवार विलंब होत असल्याने कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. कर्मचाऱ्यांचे दरमहा नियमित वेतन व मानधन ठराविक तारखेला देण्यात यावे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व रजेचे रोखीकरण यासह सर्व लाभ वेळेत देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास येत्या काही दिवसांत कामबंद आंदोलन व तीव्र निदर्शने करण्यात येतील, असा इशारा देण्यात आला. आंदोलनामुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ता दिवाबत्ती यांसह अत्यावश्यक नागरी सेवांवर परिणाम झाल्यास त्याची जबाबदारी नगर परिषद प्रशासनाची राहील, असे संघटनेचे अध्यक्ष आनंदमोहन अहिर, दुर्गासिंग ठाकूर, बाळू सरकटे, राजू जोगदंड, रमेश वैराळे, दीपक कदम व सुनील सोनोने यांनी निवेदनातून स्पष्ट केले.

# गणेशोत्सव बनला गणितोत्सव

### जि.प. हायस्कूल, आसलगाव येथे राबविला उपक्रम - '२१ गणितीय दुर्वा' विद्यार्थ्यांना अनुक्रमे तिनं बक्षिसे....!

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवानिमित्त जि.प. हायस्कूल, आसलगाव मध्ये '२१ गणितीय दुर्वा' नावाचा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. विद्यार्थ्यांना गणिताची आवड निर्माण व्हावी, गणिताचा अधिकाधिक सराव व्हावा या करीता शाळेचे सहाय्यक शिक्षक अनिल अभिमन्यू भगत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात आहे. गणपतीबाप्पाला दुर्वा प्रिय आहे, म्हणून बाप्पाला २१ दुर्वा वाहिल्या जातात. या पार्श्वभूमीवर गणपती स्थापना ते विसर्जनापर्यंत प्रत्येक वर्गाला २१ गणिते घरी सोडविण्यासाठी व्हाट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून दिले जातात. पायाभूत संख्याज्ञान व साक्षरता दृढ व्हावी, या उद्देशाने वर्ग ६ ते १० ला बुद्धिमत्ता, तर्कशक्ती व वर्गनिहाय अभ्यासक्रमावर आधारित दररोज २१ गणिते विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्याकडून सोडवून घेण्यात येतात. गणपती विसर्जनानंतर यावर आधारीत "परीक्षा" घेऊन" विठ्ठल राऊत" यांच्याकडून प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शिल्ड रूपात बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. उत्सवाच्या काळात विद्यार्थ्यांना अभ्यासाशी जोडून ठेवणाऱ्या सहाय्यक शिक्षक अनिल भगत यांच्या ह्या नुतन उपक्रमाबद्दल पालकांमध्ये उत्सुकता आहे. याबद्दल पालकांनी त्यांचे धन्यवाद मानत अभिनंदन केले आहे.

सदर उपक्रम मुख्याध्यापक प्रेमसिंग राठोड यांच्या नेतृत्वात, अनिल भगत यांच्या मार्गदर्शनात शिक्षक सुरेशभोपळे, सुचिता जैन यांच्या सहकार्याने राबविला जात आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची गोडी निर्माण होण्यास मदत होत आहे हे विशेष.

## 27 सार्वजनिक व घरगुती मंडळांचे गणपती विसर्जन आज

**सिंदखेडराजा :** शहरातील गणपती विसर्जन परंपरेनुसार ११ व्या दिवशी, म्हणजेच २४ सप्टेंबर आज (गुरुवार) रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन आणि नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने विसर्जन मिरवणूक शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी जय्यत तयारी व काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. १० दिवस पूर्ण उत्सव साजरा करून ११ व्या दिवशी विसर्जन करण्याची सिंदखेड राजा शहरात जुनी प्रथा आहे. यंदा अनंत चतुर्दशी १२ व्या दिवशी येत असल्याने इतरत्र १२ दिवसांचा उत्सव साजरा होत असला, तरी शहरात परंपरेचे काटेकोर पालन करत २४ सप्टेंबर रोजीच (११ व्या दिवशी) श्रींचे विसर्जन केले जाणार आहे. शहरात एकूण २७सार्वजनिक मंडळे असून, या सर्व मंडळांच्या तसेच घरगुती व लहान-मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येणार आहे. मिरवणूक मार्ग आणि विसर्जन स्थळाची स्वच्छता व अद्ययावत तयारी पूर्ण झाली आहे विसर्जन स्थळी मोठमोठ्या गणेश मूर्तीसाठी क्रेनची व्यवस्था करण्यात आली असून, भव्य विद्युत रोषणाई (लाइटिंग व्यवस्था) करण्यात आली आहे.

# साखरखेर्डा येथे अपर तहसीलदार कार्यालय कार्यान्वित

### महाराष्ट्र शासनाचा निर्णय

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**सिंदखेडराजा :** शासनाने सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करून ते कार्यान्वित करण्यास अधिकृत मान्यता दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी याबाबतचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित केला आहे. शासकीय कार्यालयांमधील कामकाजाचा वाढता व्याप, उपलब्ध अपुरा कर्मचारीवृंद, तालुक्याचे भौगोलिक स्थान, वाढती लोकसंख्या व नागरीकरण लक्षात घेता प्रशासन लोकाभिमूख आणि गतिमान करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या नवीन कार्यालयामुळे नागरिकांना महसुली सेवा अधिक सहज, जलद आणि जवळ उपलब्ध होणार आहेत. या निर्णयानुसार अपर तहसीलदार कार्यालय, साखरखेर्डा (एकूण २ महसूल मंडळे) शेंदूर्जन साखरखेर्डा, तहसीलदार कार्यालय, सिंदखेड राजा (एकूण ५ महसूल मंडळे) सिंदखेड राजा, सोनोशी, किनगाव राजा दुसरबीड, मलकापूर पांग्रा, प्रशासकीय अधिकार व नियंत्रण अधिकारी, साखरखेर्डा अपर तहसीलदार कार्यालयासाठी अपर तहसीलदार यांची पदस्थापना थेट शासनस्तरावरून केली जाईल. इतर आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक स्तरावरून जिल्हाधिकारी केली जाईल. अधिकार क्षेत्रः नवीन अपर तहसीलदार कार्यालयाकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये आखून दिलेल्या क्षेत्रासाठी सर्व अधिकार व कर्तव्ये सोपवण्यात येतील. साखरखेर्डा येथील अपर तहसीलदार यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून 'उपविभागीय अधिकारी' आणि नियंत्रक अधिकारी म्हणून 'जिल्हाधिकारी, बुलढाणा' काम पाहतील. तसेच अपर तहसीलदार यांना कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. निवडणूक, संजय गांधी निराधार योजना व इतर वैयक्तिक अर्ज/निवेदने अपर तहसीलदार कार्यालयात स्वीकारून ती पुढील कारवाईसाठी मूळ तहसील कार्यालयाकडे पाठवली जातील. सध्या तात्पुरत्या स्वरूपात हे नवीन अपर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यासाठी जागा निश्चित केली जाईल. त्यानंतर कायमस्वरूपी नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर केला जाणार आहे. प्राथमिक सर्व बाबींची पूर्तता करून १५ दिवसांत शासनाला अहवाल सादर केल्यानंतर प्रत्यक्ष कामकाजाची तारीख शासनस्तरावरून कळवली जाईल. साखरखेर्डा येथे अपर तहसील कार्यालय मंजुरीमुळे परिसरातील ग्रामस्थांना आणि शेतकऱ्यांना आपल्या महसुली कामांसाठी सिंदखेड राजा येथे जाण्याची गरज भासणार नाही, ज्यामुळे वेळ आणि पैशांची मोठी बचत होणार आहे. या निर्णयाबद्दल साखरखेर्डा परिसर व सिंदखेड राजा तालुक्यातील नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.

# शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही

## भरघोस मदत करणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला** : कमी पर्जन्यमान आणि पावसातील खंड यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. मात्र, शेतक-यांनी धीर सोडता कामा नये. शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही; भरघोस मदत करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



जिल्ह्यातील दुष्काळसदृश् परिस्थितीची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बाळापूर तालुक्यातील धधम व व्याळा या गावांना भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार अनुप धोत्रे, आमदार संजय गायकवाड, आमदार किरण सरनाईक, महापौर शारदा खेडकर, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, माजी आमदार नारायण गव्हाणकर, माजी आमदार संजय रायमुलकर, माजी आमदार विप्लव बाजोरिया आदी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी धधम येथे जीटी जाधव यांच्या शेतात व व्याळा येथील सविता वासुदेव वाशिमकर यांच्या शेतात पीक नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. नैसर्गिक संकटाने हताश झालेल्या शेतक-यांना त्यांनी दिलासा दिला. ते म्हणाले की, शेतक-यांनी धीर सोडू नये. शासन त्यांच्यासोबत उभे आहे. येणारी दिवाळी काळी होऊ देणार नाही.

शेतकरी बांधवांना भरघोस मदत करण्यात येईल. यासंबंधी कॅबिनेटमध्येही चर्चा झाली असून, लवकरच अधिसूचना काढण्यात येईल. ते पुढे म्हणाले की, पावसात प्रदीर्घ खंड पडल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले. तूर, सोयाबीन व इतरही पीकांचे नुकसान झाले. अशा वेळी सर्वांनी एकत्रित येऊन शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे सरकारच्या तिजोरीवर शेतकऱ्यांचा पहिला अधिकार आहे. आम्ही शेतकऱ्यांसोबत आहोत. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी विविध यंत्रणांचे अधिकारी, शेतकरी बांधव उपस्थित होते.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

## 40 वर्षांपासून रुग्णसेवेची परंपरा

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला**: येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.




गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoe-opathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.

माझे नांव अस्मिता, मला नाईक होमिओपॅथी मध्ये येण्याअगोदर खुप थकवा, आळस जाणवयाचा, वजन वाढले होते. एनर्जी लेव्हल कमी झाली होती. आता दोन महिन्याच्या नाईक होमिओपॅथी मधील उपचाराने मला खुप समाधान आहे या दोन महिन्याच्या उपचारामुळे माझे ५ किलो वजन कमी झाले. थकवा कमी झाला. एनर्जी लेव्हल वाढली. कामात उत्साह वाटतो.

# युवकाचा जागीच मृत्यू

**अमरावती** : वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी उभारलेला गतिरोधकच आता मृत्यूचा सापळा ठरत असल्याचा धक्कादायक प्रकार वलगाव परिसरात समोर आला आहे. परतवाड्याहून अमरावतीकडे दुचाकीने येत असताना अचानक आलेल्या गतिरोधकावर दुचाकी उसळली आणि चालक थेट बाजूने जाणाऱ्या ट्रकच्या मागील चाकाखाली आला. ट्रकचे चाक अंगावरून गेल्याने ३५ वर्षीय नरेंद्र राजेंद्र झंझाड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# सर्वच लोन एकाच छताखाली मिळणार

## हरिहर पेठेत 'स्वराज एंटरप्रायजेस'चा दिमाखात शुभारंभ !

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**अकोला**: आयुष्यात प्रत्येकालाच कधी ना कधी घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी किंवा व्यवसायाच्या विस्तारासाठी कर्जाची गरज भासते. अशा वेळी कागदपत्रांची जुळवाजुळव आणि बँकेच्या फेऱ्या मारताना सर्वसामान्य नागरिकांची बरीच दमछाक होते. नागरिकांची हीच पायपीट थांबावी आणि बँकिंग व ऑनलाइन सेवा एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात, या उदात्त हेतूने अकोला शहरातील हरिहर पेठ परिसरातील सीता माता मंदिरासमोर 'स्वराज एंटरप्रायजेस'ची नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे.



मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या ग्रँड ओपनिंग सोहळ्याला परिसरातील नागरिक आणि निमंत्रितांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवीन उपक्रमाला भरभरून शुभाशीर्वाद दिले. स्वराज एंटरप्रायजेसचे संचालक राम सांगळे आणि राज वाकोडे यांनी या नवीन उपक्रमामागील भावना व्यक्त करताना सांगितले की, 'आजच्या धावपळीच्या युगात नागरिकांचा बहुमूल्य वेळ फुकट जाऊ नये, हा आमचा मुख्य उद्देश आहे.' या केंद्रामध्ये नागरिकांना होम लोन, कार लोन, एज्युकेशन लोन आणि बिझनेस लोन यांसारख्या विविध कर्जांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि अर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य मिळणार आहे.

फक्त कर्जप्रक्रियाच नव्हे, तर डिजिटल युगाची गरज लक्षात घेत येथे क्रेडिट कार्ड बिल पेमेंट, पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड काढणे यासह विविध शासकीय व ऑनलाइन सेवांची कामे केली जाणार आहेत. तसेच ऑनलाइन पेमेंट आणि कॅशसंबंधित सेवाही एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे नागरिकांना आता वेगवेगळ्या कामांसाठी विविध ठिकाणी भटकण्याची गरज उरणार नाही. एकाच ठिकाणी अनेक सुविधा मिळणार असल्याने स्थानिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे. उद्घाटनाच्या या मंगल प्रसंगी संचालक राम सांगळे आणि राज वाकोडे यांनी उपस्थित सर्व नागरिक, ग्राहक व शुभेच्छुकांचे मनापासून आभार मानले. अकोलेकरांच्या सेवेसाठी सज्ज झालेल्या या 'स्वराज एंटरप्रायजेस'मुळे परिसरातील नागरिकांची अनेक कामे आता अधिक सोपी होणार आहेत.






# तांदळी फाट्यावर पकडलेल्या संशयितांना चौकशीविना सोडल्याचा आरोप

प्रतिनिधी २४ सप्टेंबर

**पातूर** : बाबुळगाव महामार्गावरील तांदळी फाट्याजवळ संशयास्पद परिस्थितीत पिकअप वाहनासह आढळलेल्या चार व्यक्तींपैकी दोघांना ग्रामस्थांनी पकडून पातूर पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतर, पोलिसांनी त्यांची पुरेशी चौकशी न करता सोडून दिल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तांदळी फाट्याजवळ एक पिकअप वाहन व चार व्यक्ती संशयास्पद अवस्थेत आढळून आल्या. ग्रामस्थांनी त्यांची विचारपूस केली असता समाधानकारक माहिती मिळाली नसल्याने संशय अधिक बळावला. त्यानंतर ग्रामस्थांनी वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये कुऱ्हाड व मोटारपंप असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, चौकशी सुरू असतानाच चारपैकी दोन व्यक्तींनी घटनास्थळावरून पळ काढल्याची माहिती समोर आली. उर्वरित दोन व्यक्तींना ग्रामस्थांनी पकडून पातूर पोलिसांच्या स्वाधीन केले.

ग्रामस्थांनी पकडून दिलेल्या दोन्ही संशयितांची पोलिसांनी सखोल चौकशी करणे, पिकअप वाहनाची कागदपत्रे तपासणे, वाहनातील साहित्याची मालकी व त्याचा स्रोत पडताळणे तसेच परिसरातील अलीकडील चोरीच्या घटनांशी काही संबंध आहे का, याचा तपास करणे अपेक्षित असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.






भवानी माता श्री गणेश उत्सव मंडळ हिवरखेड



चंडिकामाता गणेश उत्सव मंडळ हिवरखेड



मोठा महादेव संस्थान श्री गणेश उत्सव मंडळ हिवरखेड



मेन रोडचा महाराजा तुळजाभवानी नवदुर्गा उत्सव मंडळ,हिवरखेड



श्री वनकेश्वर गणेश उत्सव मंडळ मनकर्णा प्लॉट अकोला



भवानी पेठ गणेश उत्सव मंडळ तारफैल अकोला



श्री राम सेना गणेश उत्सव मंडळ हनुमान बस्ती



तपे हनुमान सेना गणेश उत्सव मंडळ मोहता मिल चाळ



शाहिद भगत सिंह गणेश मंडळ मनकर्णा प्लॉट अकोला



चिंतामणी गणेश



गड्डम प्लॉटचा महाराजा



श्री संघर्ष गणेशोत्सव मंडळ रतनलाल प्लॉट


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135